सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १९१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

राज्यातील दोन राखीव वनक्षेत्रांना अभयारण्याचा दर्जा : मुख्यमंत्री

मुंबई: गडचिरोली जिल्ह्यातील रानम्हशींसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्रास वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात तसेच तानसा वन्यजीव अभयारण्य क्षेत्राजवळील नवीन विस्तारित तानसा वन्यजीव अभयारण्यास वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या राज्य वन्य जीव मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच पुणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, ठाणे, पालघर आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील 14 संवर्धन राखीव क्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यताही यावेळी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची 26 वी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच वन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, मंडळाचे सदस्य तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्यासह मंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते.

गडचिरोली जिल्ह्यातील कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्राला वन्यजीव अभयारण्य घोषित करण्याच्या प्रस्तावालाही यावेळी मान्यता देण्यात आली. कोलामार्का संवर्धन क्षेत्र हे रानम्हशींसाठी उपयुक्त क्षेत्र असल्याने त्यास अभयारण्य

म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याशिवाय पुणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, ठाणे, पालघर आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील 14 संवर्धन राखीव क्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यता दिली. यामध्ये पुणे/ रायगड जिल्ह्यातील वेल्हे मुळशी, पुणे जिल्ह्यातील भोरगिरीगड, नाशिकमधील दिंडोरी, सुरगना व ताहाराबाद, नंदुरबारमधील चिंचपाडा, रायगडमधील अलिबाग व घेरा मानिकगड, पुणे/रायगडमधील लोणावळा, ठाणेमधील गुमतारा, पालघरमधील जव्हार, आशेरीगड व धामणी आणि चंद्रपूरमधील एकारा यांचा समावेश आहे.

तानसा वन्यजीव अभयारण्य मानव विरहीत करण्यासाठी नवीन विस्तारित तानसा वन्यजीव अभयारण्यात मौजे ओगदा, खोडदे, तिरमाळ, पाचघर, फणसाड आणि आमले या सहा गावांतील 588.767 हेक्टर महसुली व खासगी क्षेत्र समाविष्ट करण्याच्या प्रस्तावास मंडळाने मान्यता दिली. कोका वन्यजीव अभयारण्यातील 100.139 चौरस किलोमीटर आणि जायकवाडी पक्षी वन्यजीव अभयारण्यातील 255.79 चौरस किलोमीटर क्षेत्र धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावांनाही मंडळाने मान्यता दिली.

अभयारण्यांमधील धरणांची दुरुस्ती, पुनर्वसन आणि गाळ काढण्याची नियमित कामे संबंधित अभयारण्यांच्या व्यवस्थापन आराखड्यात समाविष्ट करावीत. नियमांशी सुसंगत मानक कार्यपद्धती तयार करून तीन महिन्यांत व्यवस्थापन आराखड्यांमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात. या कामांसाठी प्रत्येक वेळी स्वतंत्र मान्यता घेण्याऐवजी संबंधित वन्यजीव अधिकाऱ्यांना पूर्वसूचना देण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. संरक्षित क्षेत्रे, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रे आणि व्याघ्र भ्रमणमार्गांतील सिंचन, आरोग्य, पाणीपुरवठा, पूल, रस्ते, भूमिगत ऑप्टिकल फायबर, वीजवाहिनी आदींसह इतर पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांनाही यावेळी मान्यता देण्यात आली. राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पांचे गाभा, बफर व अधिसूचित पर्यावरण संवेदनशील क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणून अधिसूचित करणे, मानव-वन्यजीव संघर्षाला नैसर्गिक आपत्ती घोषित करणे आणि व्याघ्र प्रकल्पांच्या बफर क्षेत्रातील इच्छुक गावांच्या पुनर्वसनासाठी धोरण तयार करणे या प्रस्तावांवरही बैठकीत चर्चा झाली.

मुंबईत आठवड्यातून एक दिवस बांधकामे बंद ठेवा

मंत्री आशिष शेलार यांची महापालिका आयुक्तांना सूचना

मुंबई : मुंबईतील वाढत्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी संपूर्ण मुंबई महापालिका क्षेत्रात आठवड्यातून एक दिवस सर्व बांधकामे आणि पाडकामे बंद ठेवावीत, अशी सूचना सांस्कृतिक कार्यमंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्राद्वारे केली आहे. हिवाळ्यात प्रदूषणाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन तातडीच्या उपाययोजनांसह दीर्घकालीन कृती आराखडा राबविण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मुंबईतील हवेच्या खालावत्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून निवेदने प्राप्त झाली असून, मुंबई उच्च न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांचे स्वागत करताना, २०१७-१८ पासून पीएम-१० प्रदूषणाच्या पातळीत सुमारे ४८ टक्क्यांनी घट झाल्याचे शेलार यांनी नमूद केले. मात्र, प्रदूषणावर प्रभावी नियंत्रणासाठी आणखी व्यापक उपायांची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले मुंबईसाठी स्वतंत्र श्रेणीबद्ध कृती आराखडा तयार करून हवेची गुणवत्ता खालावताच पूर्वनिश्चित उपाययोजना लागू कराव्यात, असे त्यांनी सुचविले आहे. प्रदूषणग्रस्त भाग आणि प्रमुख वाहतूक मार्गांवर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याने रस्ते धुणे, पाण्याची फवारणी करणे, रात्री यांत्रिक पद्धतीने रस्ते स्वच्छ करणे, खड्डे तातडीने बुजविणे आणि खोदकामानंतर रस्ते वेळेत पूर्ववत करणे, यावर त्यांनी भर दिला आहे.

नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या जमिनीच्या हस्तांतरणावरील 25 टक्के शुल्क माफ : चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : राज्यातील सौर आणि पवन ऊर्जेसारख्या नवीन ऊर्जा प्रकल्पांना चालना देण्यासाठी जमिनीच्या अंतर्गत हस्तांतरणावर आकारले जाणारे 25 टक्के शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मुख्य कंपनीकडून त्याच कंपनीच्या विशिष्ट प्रकल्पासाठी स्थापन केलेल्या उपकंपनीकडे जमीन हस्तांतरित करताना ही सवलत लागू होणार आहे. त्यामुळे ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीतील अतिरिक्त आर्थिक भार कमी होऊन गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायद्यांतर्गत औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेल्या जमिनीचे हस्तांतरण करताना रेडी रेकनरनुसार निर्धारित बाजारमूल्याच्या 25 टक्के शुल्क जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करावे लागत होते. नवीन ऊर्जा प्रकल्प उभारताना बँकांकडून कर्ज मिळविणे किंवा परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे यांसारख्या कारणांसाठी मुख्य कंपनीला संबंधित जमीन स्वतंत्र उपकंपनीच्या नावावर करावी लागते. अशा वेळी कंपनीची मालकी कायम असतानाही केवळ अंतर्गत आणि कागदोपत्री हस्तांतरणासाठी मोठे शुल्क भरावे लागत होते. त्यामुळे प्रकल्पांच्या खर्चात वाढ होऊन ऊर्जा निर्मितीच्या कामांना विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर 18 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार हस्तांतरण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सवलतीमुळे प्रकल्पांसाठी जमीन उपकंपनीच्या नावावर करताना कंपन्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. परिणामी, प्रकल्प खर्चात बचत होऊन नवीन ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे. सवलतीसाठी जमिनीच्या वापराची अट शुल्कमाफीचा लाभ घेतलेल्या जमिनीचा अंतिम वापर फक्त नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठीच करणे बंधनकारक राहणार आहे. संबंधित कंपनीने ही जमीन नंतर निवासी, व्यावसायिक किंवा अन्य कारणासाठी वापरल्यास अथवा तृतीय पक्षाला विकल्यास शुल्कमाफी रद्द केली जाईल. अशा परिस्थितीत हस्तांतरण शुल्काची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्यात येणार आहे. त्यामुळे शुल्कमाफीचा लाभ निर्धारित उद्देशासाठीच वापरला जाईल, याची खबरदारी शासनाने घेतली आहे.

'शेतकऱ्याला छळाल तर तुरुंगात पाठवू'; बँका, पतसंस्था, विमा कंपन्या, मायक्रो फायनान्स आणि सावकारांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

नाशिक : दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करणाऱ्या बँका, पतसंस्था, विमा कंपन्या, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना त्रास देऊ नये, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. शेतकऱ्यांवर दबाव आणून त्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल आणि दुष्काळग्रस्त हरसूल परिसरात शिवसेनेच्या वतीने १० हजार आदिवासी कुटुंबांना दिवाळीनिमित्त शिधावाटप करण्यात आले. या कार्यक्रमात शिंदे बोलत होते. संकटाच्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी

उभे राहणे हीच शिवसेनेची भूमिका असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

दुष्काळामुळे उभी पिके करपली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या मागे लागणे सहन केले जाणार नाही, असे शिंदे यांनी सांगितले. शेतकऱ्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्यास त्यामागे दबाव आणणाऱ्यांची भूमिका तपासली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांनी निराश होऊन कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये. आपल्या अडचणी शिवसेनेचे कार्यकर्ते, प्रशासन आणि सरकारपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त असल्याचा उल्लेख करत पात्र शेतकऱ्यांना दुष्काळातील सवलती आणि लाभ देण्यात येतील, असे शिंदे यांनी सांगितले. तातडीची पाच हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. दुष्काळाच्या प्रश्नावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा झाल्याचे सांगत केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रत्येक भागात 'शेतकरी मदत कक्ष' सुरू करण्याचे निर्देश शिंदे यांनी शिवसैनिकांना दिले. पीक नुकसानीचे पंचनामे, अर्ज, नुकसानभरपाई, पाणीपुरवठा, टँकर आणि शासकीय योजनांचे लाभ वेळेत मिळत आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. "आता दुसरे काम नको; बांधावर, शेतावर आणि शेतकऱ्यांच्या घरी जा," असे सांगत त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष मदतकार्यात सहभागी होण्यावर भर दिला.

शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी केंद्राच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधीतील सहा हजार रुपयांसोबत राज्य सरकारकडून सहा हजार रुपये देऊन वार्षिक मदत १२ हजार रुपये करण्यात आल्याचा उल्लेख शिंदे यांनी केला. याशिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींच्या उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षणाची तरतूद, एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, नैसर्गिक आपत्तीतील मदतीत वाढ, दोनऐवजी तीन हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई आणि सततचा पाऊस तसेच गोगलगायींमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत अशा निर्णयांची माहिती त्यांनी दिली.

लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये मोठ्या आवाजात गाणी लावणे किंवा बोलणे पडणार महाग!

मुंबई : रेल्वेतून प्रवास करताना मोबाइलवर मोठ्या आवाजात गाणी ऐकणे, व्हिडिओ पाहणे किंवा मोठ्याने फोनवर गप्पा मारणे तुम्हाला चांगलेच महाग पडू शकते. रेल्वे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, शांत आणि विनाअडथळा व्हावा यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना मोबाइल व इतर ऑडिओ उपकरणांचा संयमाने आणि समंजसपणाने वापर करण्याचे आवाहन केले आहे.

काय आहे रेल्वेचे आवाहन?

पश्चिम रेल्वेने जारी केलेल्या सूचनेनुसार, ट्रेनमध्ये किंवा रेल्वे परिसर (प्लॅटफॉर्म, वेटिंग रूम) येथे प्रवास करताना प्रवाशांनी

इतरांच्या शांततेचा विचार करणे गरजेचे आहे.

स्पीकरवर (Speaker Mode) मोठ्या आवाजात गाणी, व्हिडिओ किंवा रील्स पाहणे टाळावे.

संगीताचा आनंद घेण्यासाठी किंवा व्हिडिओ पाहण्यासाठी अनिवार्यपणे इअरफोन (Earphones) किंवा हेडफोन (Headphones) चा वापर करावा.

फोनवर संवाद साधताना शक्य तितक्या हळू आवाजात बोलावे, जेणेकरून शेजारी बसलेल्या प्रवाशांना त्याचा त्रास होणार नाही.

नियम मोडल्यास 1,000 रुपयांचा दंड! अनेकदा रात्रीच्या वेळी किंवा प्रवासादरम्यान काही प्रवासी मोबाईलचा स्पीकर ऑन ठेवून गाणी ऐकतात किंवा मोठ्याने गप्पा मारतात. यामुळे इतर प्रवाशांच्या, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि लहान मुलांच्या प्रवासात अडथळा निर्माण होतो. रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी ऊँची आवाजात गाणी बजावणे किंवा उपद्रव निर्माण करणे हा 'रेल्वे कायदा कलम १४५' (Railway Act Section 145) अंतर्गत दंडनिय अपराध मानला जाईल. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर ₹1,000/- पर्यंत दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. तसेच, रेल्वे कर्मचारी किंवा टीसी (TC/Railway staff) यांनी सूचना दिल्यानंतरही जर एखाद्या प्रवाशाने ऐकले नाही किंवा हाच प्रकार सुरू ठेवला, तर त्याच्यावर पुढील कडक कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई केली जाईल. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना प्रत्येकाने शिष्टाचार पाळणे गरजेचे आहे. प्रवासादरम्यान इतरांच्या सोयीचा विचार करणे आणि सहप्रवाशांना कोणताही त्रास न देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

'महा कॅम्पा' निधीतून व्याघ्र प्रकल्पांतील गावांचे पुनर्वसन पूर्ण करा ! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

वनीकरणाच्या कामांची उपग्रह तंत्रज्ञानाद्वारे पडताळणी करणार

मुंबई : व्याघ्र प्रकल्प आणि अन्य संरक्षित वनक्षेत्रांतील गावांच्या पुनर्वसनाची कामे महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाच्या (महा कॅम्पा) निधीतून पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. तसेच या निधीतून करण्यात आलेल्या वनीकरण, मृद व जलसंधारणाच्या कामांची उपग्रह आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पडताळणी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महा कॅम्पा प्राधिकरणाची बैठक झाली. या बैठकीत निधीच्या वापराचा आढावा घेताना ते बोलत होते. वनसंवर्धन राखीव क्षेत्रातील नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी कॅम्पा निधीचा प्रभावी वापर करता येईल, असे त्यांनी नमूद केले. बैठकीला वनमंत्री गणेश नाईक दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. कॅम्पाअंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या पडताळणीची सध्याची पद्धत बदलून अधिक पारदर्शकता आणावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. पूर्ण झालेल्या वनीकरणाच्या कामांपैकी काही कामांची नमुन्यादाखल निवड करून सर्वेक्षण करावे. मृद व जलसंधारणासह वनीकरणाची कामे संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने आणि निर्धारित उद्दिष्टांनुसार पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत वेळेत द्या; ऑगस्ट 2027 पर्यंत पाणी-चाऱ्याचे नियोजन करा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

नाशिक : राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांची प्रभावी आणि कालबद्ध अंमलबजावणी करावी. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, टँकरद्वारे पाणीपुरवठा, रोजगार हमीची कामे आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत या बाबींना प्राधान्य देत सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे. तसेच ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध होईल, असे नियोजन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सोमवारी (२६ ऑक्टोबर) आयोजित दुष्काळ निवारण आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळग्रस्तांना मदत देण्यात दिरंगाई नको

दुष्काळाच्या संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, जाहीर केलेल्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. पीक नुकसानीचे पंचनामे, अर्जांची पडताळणी आणि आर्थिक मदतीचे वितरण या प्रक्रिया पारदर्शकपणे व वेगाने पूर्ण कराव्यात. कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. आधार प्रमाणीकरण, आवश्यक कागदपत्रे किंवा अन्य प्रशासकीय प्रक्रियांमध्ये शेतकऱ्यांना अडचणी येत असल्यास स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांचे तातडीने निराकरण करावे. जाहीर केलेली आर्थिक मदत लाभार्थ्यांच्या बँक खात्यांत वेळेत जमा होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणी आणि चाऱ्याचे नियोजन

आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावनिहाय पाणी उपलब्धतेचा आढावा घ्यावा. कोणत्या गावांना टँकरची आवश्यकता आहे, जनावरांसाठी किती चारा उपलब्ध आहे आणि रोजगार हमीची किती कामे सुरू करता येतील, याचे नियोजन करण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच जलसंधारणाची कामे, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार उपक्रम, शेततळी आणि पाणीसाठा वाढविणाऱ्या

योजनांना गती द्यावी. दीर्घकालीन पाणीटंचाईचा विचार करून ऑगस्ट २०२७ पर्यंतच्या गरजांसाठी प्रशासनाने आतापासूनच तयारी करावी, असे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांवरील सक्तीच्या कर्जवसुलीचा दबाव टाळा

दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी अनावश्यक दबाव आणू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका आणि सूक्ष्म वित्त संस्थांनी शासनाच्या लागू निर्देशांचे पालन करून शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा संवेदनशीलतेने विचार करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसोबतच मानसिक आधार देणेही महत्त्वाचे आहे. त्यांच्या अडचणी समजून घेऊन प्रश्न तातडीने सोडवावेत आणि संकटाच्या काळात त्यांच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींचा लाभ मिळवून द्या

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शासनाने जाहीर केलेल्या शैक्षणिक शुल्क सवलती आणि अन्य लाभ वेळेत मिळावेत, यासाठी संबंधित विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, असे शिंदे यांनी सांगितले. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या आदेशांचे पालन होत असल्याची खात्री करावी. निर्णयांच्या अंमलबजावणीत कसूर झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दुष्काळ निवारणासाठी महसूल, कृषी, जलसंपदा, जलसंधारण, पशुसंवर्धन, ग्रामविकास आणि इतर संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करून शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. बैठकीत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी नाशिक जिल्ह्यात सुरू असलेल्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची माहिती दिली.

सिंहस्थ ध्वजारोहण सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. या सोहळ्यासाठी अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, मान्यवर आणि भाविकांची संभाव्य उपस्थिती लक्षात घेऊन वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा, गर्दी नियंत्रण, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, आपत्कालीन सेवा आणि पार्किंग यांचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कार्यक्रमांसाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी समन्वय राखून जबाबदाऱ्यांचे स्पष्ट वाटप करावे. धार्मिक परंपरा आणि सोहळ्याचे पावित्र्य जपत भाविकांना सुरक्षित व सुलभ सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ध्वजारोहण सोहळा शिस्तबद्ध, सुरक्षित आणि सुरळीत पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे, असे निर्देश शिंदे यांनी दिले.

या बैठकीला पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री दादाजी भुसे, नरहरी झिरवाळ, महापौर हिमगौरी आडके आहेर, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार भास्कर भगरे, आमदार गोकुळ गीते, किशोर दराडे, सीमा हिरे, प्रधान सचिव नवीन सोना, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

माजलगावात बालाजी मंदिर येथे त्रीदिवशी ब्रम्होत्सव आनंदात साजरा

माजलगाव : माजलगावातील बालाजी मंदिर येथे ब्रम्होत्सवा निमित्ताने गोविंदा गोविंदा नामाच्या गजरात शनिवारी भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात आली व त्रिदिवशी श्रीनिवास कल्याणम महोत्सवा व हवन विधी आयोजित केला.शुक्रवार, शनिवार रविवारी रोजी विधी वत पुजन करून 1000 महिलाव भक्तांच्या वतीने विष्णु सहस्त्रनामा पठण केले. तसेच श्री. बालाजी भगवान च्या पालखी चे 3, दिवस प्रदक्षिणा कार्यक्रम पार पडला तसेच द्वितीय दिनी भागवान श्री बालाजी चे लक्ष्मी देवी विवाह सोहळा आनंदात साजरा करण्यात आला.

कोजागिरी पौर्णिमेच्यि दिवशी श्री देवी-भुदेवी समावेत श्री व्यंकटेश्वर स्वामी चे पुण्ययुग व श्री बालाजी मंदिर महानैवेद्य,महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या महाप्रसादाचा हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला.या महाप्रसादाचे यजमान राम स्वरुप खंडेलवाल व कारभारी काळे हे होते.

या तीन दिवस अतिशय आनंदाचे वातावरणात सर्व कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. श्री बालाजी मंदिर फाउंडेशनच्या वतीने या ब्रम्होत्सव कार्यक्रम माजलगावातील सर्व भाविक भक्तांनी भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल धन्यवाद व आभार व्यक्त केले.

केज शहराचे वाढणार वैभव: स्व. गोपीनाथराव मुंडे सभागृहाचे काम अंतिम टप्प्यात; आ. नमिता मुंदडांच्या विशेष प्रयत्नांना यश

केज / प्रतिनिधी

केज शहरात सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या बहुप्रतिक्षित 'स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहाचे' बांधकाम आता अंतिम टप्प्यात आले आहे. आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे साकारत असलेली ही आकर्षक वास्तू लवकरच केजवासीयांच्या सेवेत रुजू होणार असून, यामुळे शहराच्या वैभवात मोठी भर पडणार आहे.

ठळक मुद्दे

अंतिम टप्प्यात काम: आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यातून साकारत असलेल्या या सभागृहाचे काम वेगात सुरू असून, दिवाळीनंतर हे काम पूर्ण होण्याची नागरिकांना प्रतीक्षा आहे.

भव्य कमाणीची मागणी: शहरामधील इतर प्रमुख ठिकाणांप्रमाणेच या सभागृहाच्या प्रवेशद्वारासमोरही एक आकर्षक व भव्य कमान उभारण्याची नागरिकांची जोरदार मागणी आहे.

रस्त्याचे रुंदीकरण व नालेसफाई: सभागृहाकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने रस्त्याचे रुंदीकरण करून दोन्ही बाजूंना भूमिगत नाल्यांचे नियोजन करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

आ. नमिता मुंदडांकडे लक्ष: केजवासीयांच्या या सर्व मागण्यांची दखल घेऊन संबंधित यंत्रणेकडे तातडीने पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा

नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नांना यश

केज शहरात विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी एका प्रशस्त सभागृहाची तीव्र निकड होती. नागरिकांची हीच गरज लक्षात घेऊन आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी शासनाकडून तब्बल अकरा कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आणि 'स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब' यांच्या नावाने या भव्य सभागृहाची उभारणी सुरू केली. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच रखडलेले हे काम आता पूर्णत्वाच्या मार्गावर पोहोचले असून, लवकरच हे सभागृह केजवासीयांसाठी खुले होईल.

नागरिकांच्या महत्त्वाच्या मागण्या

केजमधील महामार्गावर पंचायत समिती कार्यालय, पोलीस ठाणे आणि न्यायालयाच्या परिसरामध्ये ज्याप्रमाणे आकर्षक कमाणी उभारण्यात आल्या आहेत, त्याच धर्तीवर या नव्या सभागृहासमोरही एक भव्य कमान उभारण्यात यावी, अशी स्थानिकांची आग्रही मागणी आहे. यामुळे या संपूर्ण परिसराचे सौंदर्य अधिक खुलून दिसेल.

यासोबतच, सभागृहाकडे जाणारा सध्याचा रस्ता काहीसा अरुंद असल्याने भविष्यात कार्यक्रमांसाठी येणाऱ्या नागरिकांची व वाहनांची होणारी गैरसोय टळणे गरजेचे आहे. त्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भूमिगत पद्धतीने नाल्यांचे बांधकाम करून रस्ता अधिक प्रशस्त व वाहतुकीसाठी सोयीस्कर करावा, अशी मागणी जोर धरत आहे. केजवासीयांच्या या मागण्यांची आ. नमिता मुंदडा यांच्या मार्फत प्रशासकीय यंत्रणेने तातडीने दखल घेऊन योग्य व वेळेत नियोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्व. गोपीनाथराव मुंडे सभागृहाचे हे काम आमदार नमिता मुंदडा यांच्या सक्षम नेतृत्वाखाली वेगाने पूर्ण होत असून, केजच्या विकासात आणखी एक मानाचा तुरा जोडला जात आहे.

अंबाजोगाई भूमिपुत्र डॉ. आदित्य पतकराव जागतिक व्यासपीठावर मांडणार भारताची आरोग्यदृष्टी!

अंबाजोगाई : पुणे येथील डॉ. आदित्य्स ॲडव्हान्स डेंटल हॉस्पिटलचे संस्थापक आणि सुप्रसिद्ध दंतशल्यचिकित्सक डॉ. आदित्य पतकराव यांना एशिया बँकॉक येथील संयुक्त राष्ट्रांच्या परिषद केंद्रात (UNCC) इंटरनॅशनल फोरम ऑर्गनायझेशन यांच्या आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. १५ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या या परिषदेत ते 'ओरल हेल्थ : ए हेल्दी भारत, ए हेल्दी वर्ल्ड' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत.

या परिषदेत विविध देशांतील सरकारी प्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय संस्था, नागरी समाज आणि खासगी क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. यावेळी डॉ. पतकराव मौखिक आरोग्याचे महत्त्व, दंतविकारांचे प्रतिबंध, जनजागृती आणि भारतातील आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती मांडणार आहेत.

"शाश्वत भविष्यासाठी निरोगी माणसे आवश्यक आहेत. आजारांना सीमा नसतात. त्यामुळे मौखिक आरोग्याबाबत जागरूकता आणि प्रतिबंध ही सर्व देशांची सामायिक जबाबदारी आहे. भारताचा हा संदेश जगापर्यंत पोहोचवण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे," असे डॉ. पतकराव यांनी सांगितले.

नवी सांगवीतून आंतरराष्ट्रीय व्यासपीठापर्यंत पोहोचलेली डॉ. पतकराव यांची ही झेप स्थानिक वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

बीडमध्ये अवैध सावकारी आणि कर्जमुक्तीच्या तक्रारींसाठी जिल्हास्तरीय कक्ष स्थापन; 24 तास व्हॉट्सॲप हेल्पलाइन सुरु

बीड दि. 23 (जिमाका) : जिल्ह्यातील वाढत्या अवैध सावकारीच्या तक्रारी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ आणि नवीन पीक कर्ज वाटपातील अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने स्वतंत्र जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्षाची स्थापना केली आहे. नागरिकांना आणि शेतकऱ्यांना त्यांच्या समस्यांचे त्वरित निवारण करण्यासाठी ९३०७३२५५८६ हा २४ तास चालू राहणारा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यावर लेखी स्वरूपात तक्रार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे. या तक्रार निवारण कक्षाचे प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहायक निबंधक ऋषिकेश कातळे आणि सहायक लीड बँक व्यवस्थापक श्रीकांत लोखंडे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

"अवैध सावकारांवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मायक्रो फायनान्स कंपन्या व वित्तीय संस्थांना कर्जदारांशी सौजन्याने वागण्याची सक्त ताकीद देण्यात आली असून, वसुलीसाठी गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींचा वापर करणे, सक्तीची वसुली करणे किंवा वाहने जप्त करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. २ जून २०२६ रोजी जाहीर झालेल्या कर्जमुक्ती योजनेअंतर्गत आतापर्यंत राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँकांकडील थकीत पीक कर्ज असलेल्या २,०४,३६६ शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र, अद्याप ३७,५८१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण शिल्लक असून, त्यांनी आपल्या अडचणी पुराव्यासह या नवीन कक्षाकडे नोंदवून त्वरित प्रमाणीकरण करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांनी तत्काळ नवीन पीक कर्ज वाटप करावे, अन्यथा संबंधित यंत्रणेवर कायदेशीर कारवाई केली जाईल असा स्पष्ट इशाराही या माध्यमातून प्रशासनाने दिला आहे.

डॉ. रेखा मुळे कैवाडे यांच्या 'समकालीन हिंदी कविता' पुस्तकाचे प्रकाशन

बीड (प्रतिनिधी): डॉ. रेखा मुळे कैवाडे लिखित 'समकालीन हिंदी कविता' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा बीड येथील जिव्हाळा बेघर निवासी केंद्रात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. साहित्य, शिक्षण, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांमध्ये योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास जवाहरलालजी सारडा, ॲड. सुधीरजी जाधव, प्रा. रफिक बागवान, दगडूशेठ मेहेत्रे, रमेश राऊत, रवींद्र मेहेत्रे, किशोर शिंदे, सुभाष कुलकर्णी, राजू ताठे, नाना पर्वत, संजयजी गुरव, अशोक आनेराव, डॉ. रमेश कैवाडे, सतीश महामुनी, प्रशांत देशमुख, राजू वंजारे, अभिजीत वैद्य, छाया सरवदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हिंदी साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने समकालीन कविता हा महत्त्वाचा विषय आहे. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी जीवनाचे प्रतिबिंब कवितेतून व्यक्त होत असते. समकालीन हिंदी कवितेचा अभ्यास, तिची वैशिष्ट्ये आणि साहित्यविश्वातील तिचे स्थान समजून घेण्यासाठी अशा प्रकारची पुस्तके वाचकांना तसेच साहित्याच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकतात. डॉ. रेखा मुळे कैवाडे यांनी या विषयावर पुस्तक लेखन करून साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पुस्तक प्रकाशनाचा हा सोहळा केवळ एका पुस्तकाच्या प्रकाशनापुरता मर्यादित न राहता साहित्यविषयक जाणीव आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणारा ठरला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला वैचारिक आणि साहित्यिक वातावरण लाभले. साहित्यनिर्मिती, लेखन आणि वाचन यांमधून समाजात विचारांची देवाणघेवाण घडून येते. नव्या साहित्यकृतींच्या माध्यमातून वाचकांना नवे दृष्टिकोन मिळतात. या पार्श्वभूमीवर डॉ. रेखा मुळे कैवाडे यांच्या 'समकालीन हिंदी कविता' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला साहित्यप्रेमींच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. बीड येथील जिव्हाळा बेघर निवासी केंद्रात पार पडलेल्या या कार्यक्रमाने साहित्य आणि सामाजिक जिव्हाळ्याचा सुंदर संगम घडवून आणला. उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले.

'चमत्कार' दाखवतो म्हणून सोन्याची अंगठी लंपास करणाराला बेडया

बीड (प्रतिनिधी) : परळी बसस्थानकात चमत्कार दाखवून वृद्ध प्रवाशाची सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील सराईत गुन्हेगाराला बीड स्थानिक गुन्हे शाखेने येवला येथून जेरबंद केले. अफजल नवाब मदारी (वय २५, रा. येवला, जि. नाशिक) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून १० ग्रॅम वजनाची, अंदाजे १ लाख ७ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी जप्त करण्यात आली.

२८ सप्टेंबर रोजी दुपारी परळी बसस्थानकात हेळंब येथील गणपत लक्ष्मण आंधळे या वृद्धाच्या हातात आरोपीने दगडाचा खडा देऊन त्याचा रुद्राक्ष बनवण्याचा बहाणा केला. याच संधीचा फायदा घेत त्याने

आंधळे यांच्या हातातील सोन्याची अंगठी चोरून नेली. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच फिर्यादीकडून आरोपीच्या वर्णनाची माहिती घेऊन गोपनीय बातमीदारामार्फत तपास केला. त्यातून अफजल मदारी याचे नाव निष्पन्न झाले. पथकाने येवला येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीची अंगठी जप्त करण्यात आली असून, पुढील तपास परळी शहर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक

मरीन विद्युत कंपनीत नोकरीची संधी

आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयात बुधवारी रोजगार मेळावा

बीड : अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण घेतलेल्या तरुणांसाठी रोजगाराची मोठी संधी शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई येथील प्रसिद्ध 'मरीन इलेक्ट्रिकल प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीत विविध पदांच्या भरतीसाठी बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष रोजगार मेळावा व मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरती प्रक्रियेत विद्युत अभियांत्रिकीतील पदवी (बी.ई./बी.टेक.), पदविका (पॉलिटेक्निक) आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आय.टी.आय.) विद्युत शाखा पूर्ण केलेले नवीन उमेदवार तसेच एक ते तीन वर्षांचा अनुभव असलेले उमेदवार सहभागी होऊ शकतात. मरीन इलेक्ट्रिकलसारख्या नामांकित कंपनीत करिअरची सुरुवात करण्यासाठी किंवा नवीन रोजगाराची संधी शोधणाऱ्या युवा अभियंत्यांसाठी ही सुवर्णसंधी मानली जात आहे.

या संधीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड येथील परिसंवाद सभागृहात उपस्थित राहावे. येताना आवश्यक सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी महाविद्यालयाचे नोकरी व प्रशिक्षण विभागप्रमुख (टी.पी.ओ.) सचिन कुलकर्णी यांच्याशी महाविद्यालयात येऊन संपर्क साधावा.

"मन की बात" कार्यक्रमा दरम्यान कड्यात गुणवंत खेळाडूंचा गौरव; जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते सत्कार

कडा (प्रतिनिधी) - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १३९ व्या 'मन की बात' कार्यक्रमाचे औचित्य साधून भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत गुणवंत खेळाडू विद्यार्थिनींचा सत्कार केला.

रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.००वाजता भाजपा कार्यालय, श्रीराम पेठ, कडा येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी होणाऱ्या मन की बात कार्यक्रमादरम्यान नाविन्यपूर्ण

उपक्रम आणि गुणवंतांचा सत्कार करण्याची परंपरा जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी सुरू ठेवली आहे.

बीड जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत भगिनी निवेदिता कन्या विद्यालय, कडा येथील विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. तसेच विभाग स्तर बॅडमिंटन स्पर्धा (परभणी) मधून कु. शिवांजली वाल्मिक कर्डिले हिची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. हा कड्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

सत्कार करण्यात आलेल्या यशस्वी विद्यार्थिनी : १) कु. शिवांजली वाल्मिक कर्डिले (१० वी) - राज्यस्तर निवड २) कु. कोमल सतिष सोमाडे (९ वी) ३) कु. श्रेया अशोक औटे (९ वी) ४) कु. वैष्णवी जालिंदर कुलाळ (९ वी) ५) कु. सानिका शहादेव सावंत (१० वी) या सर्व गुणवंत खेळाडूंच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव म्हणून त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले की, "आपल्या मुलींच्या या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांच्या यशातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि कड्याच्या क्रीडा क्षेत्राची यशस्वी परंपरा अधिक बहरेल. मुलींनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही असेच उंच भरारी घ्यावी." या कार्यक्रमास वैद्यनाथ बँक शाखा सल्लागार राजेंद्र शिंदे, भगिनी निवेदिता कन्या शाळेचे अध्यक्ष सुनील देशमुख, अशोक पवळ, नाना औटे, किरण किंबहुने, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकनायक जयप्रकाश नारायण जयंतीनिमित्त आंबा लागवड व निर्यातीवर व्याख्यान

प्रसिद्ध आंबा लागवड तज्ज्ञ डॉ.भगवानराव कापसे यांचे शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध मार्गदर्शन ; प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून कृषीविषयक समस्यांवर चर्चा

अंबाजोगाई : लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीनिमित्त जयप्रभा ग्रामीण विकास मंडळ, पाटोदा, ता.अंबाजोगाई, (जि.बीड) यांच्या वतीने रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी अंबाजोगाई येथे आंबा लागवड, अतिघन लागवड, आंबा बागेचे व्यवस्थापन आणि आंबा निर्यात या विषयांवर प्रसिद्ध आंबा लागवड तज्ज्ञ डॉ.भगवानराव कापसे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

बदलत्या कृषी परिस्थितीत शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालावी, शेतीकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहावे आणि फळबागांच्या माध्यमातून उत्पन्नवाढीच्या संधी निर्माण कराव्यात, या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते डॉ.भगवानराव कापसे यांनी आपल्या व्याख्यानातून आंबा लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान, अतिघन लागवड पद्धती, आंबा बागेचे नियोजन, झाडांची योग्य निगा, बागेचे शास्त्रीय व्यवस्थापन, उत्पादनाची गुणवत्ता आणि आंबा निर्यातीच्या संधी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आंबा लागवड करताना सुरूवातीपासून योग्य नियोजन करणे, जमिनीच्या परिस्थितीनुसार लागवड पद्धतीची निवड करणे, उपलब्ध साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करणे आणि बागेचे नियमित व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले. अतिघन लागवड पद्धतीचा अवलंब करताना झाडांची वाढ, छाटणी, सूर्यप्रकाश, हवा खेळती राहणे आणि बागेच्या दीर्घकालीन व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. आंबा उत्पादनात केवळ उत्पादनाचे प्रमाण वाढविणे पुरेसे नसून फळांची गुणवत्ता, आकार, रंग, टिकवण क्षमता आणि बाजारपेठेतील मागणी यांचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. निर्यातक्षम आंबा उत्पादनासाठी दर्जेदार फळे, योग्य काढणी, हाताळणी, प्रतवारी, पॅकिंग आणि बाजारपेठेच्या गरजांनुसार उत्पादनाचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे व्याख्यानानंतर आयोजित करण्यात आलेला प्रश्नोत्तरांचा संवाद. उपस्थित शेतकरी, आंबा

बागायतदार आणि कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी आंबा लागवड, बाग व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान आणि निर्यातीसंबंधी विविध प्रश्न उपस्थित केले. डॉ.भगवानराव कापसे यांनी या प्रश्नांना मार्गदर्शनपर उत्तरे दिली. त्यामुळे उपस्थितांना आपल्या शेतीतील अनुभव आणि समस्यांच्या अनुषंगाने तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करताना शास्त्रीय माहिती, स्थानिक परिस्थितीचा अभ्यास आणि योग्य नियोजन यांना महत्त्व दिले पाहिजे, हा संदेश या व्याख्यानातून मिळाला. फळबाग लागवड ही दीर्घकालीन गुंतवणूक असल्याने शेतकऱ्यांनी लागवडीपूर्वी योग्य माहिती घेऊन नियोजन करणे आवश्यक असल्याची जाणीवही या कार्यक्रमातून झाली. शेतीच्या आर्थिक विकासासाठी फळबाग लागवड महत्त्वाची

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आंबा हे उत्पन्नवाढीची क्षमता असलेले महत्त्वाचे फळपीक आहे. योग्य लागवड पद्धती, शास्त्रीय व्यवस्थापन, उत्पादनाची गुणवत्ता आणि बाजारपेठेचा अभ्यास यांच्या माध्यमातून फळबाग शेती अधिक सक्षम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. आजच्या काळात शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेता शेतकऱ्यांना केवळ पारंपरिक अनुभवावर अवलंबून न ठेवता कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठेची माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याच विचारातून जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाने या व्याख्यानाचे आयोजन केले. कृषीविषयक ज्ञानाचा प्रसार करणे, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे प्रोत्साहित करणे आणि तज्ज्ञ व शेतकरी यांच्यात संवाद निर्माण करणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा हेतू होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते सुधाकरराव महाजन (बोरिसावरगाव, ता.अंबाजोगाई) होते. कार्यक्रमाला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ.दिगंबरराव चव्हाण, उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, संभाजीदादा रेड्डी, मंचकराव देशमुख आणि प्राचार्य प्रशांत देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, शेतकरी, कृषी अधिकारी आणि आंबा बागायतदार यांच्यात विचारांची देवाणघेवाण होऊन आधुनिक शेतीविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत झाली. जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाचे सचिव शिवाजीराव खोगरे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका आणि कृषीविषयक मार्गदर्शनाची आवश्यकता विशद करून प्रास्ताविक केले. मान्यवरांचा परिचय बबन मस्के यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय बुरगे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार बन्सी पवार यांनी मानले.

आयोजित व्याख्यानाला अंबाजोगाई शहरासह पंचक्रोशीतील विविध गावांमधील शेतकरी उपस्थित होते. वरपगाव, सोनवळा, पूस, येल्डा, वरवटी, ममदापूर, माकेगाव आणि भावठाणा आदी गावांतील शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

एकत्रित कुटुंब ठेवून भगवंताचे नामस्मरण दानधर्म करा, संसार सुखी होईल : अक्काताई महाराज

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी श्री क्षेत्र वेरूळ येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त नाथ आश्रम येथे कीर्तन सोहळा; चे आयोजन करण्यात आले होते भगवंताचे नामस्मरण केले त्याचा संसार सुखाचा झाला; मात्र व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेल्यांचा संसार वाया गेला. त्यामुळे प्रत्येकाने व्यसनांपासून दूर राहून भगवंताची सेवा आणि नामस्मरण करावे, यामुळे मनुष्य जीवनात सुख, शांती आणि समाधान लाभेल," असे नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्काताई महाराज यांनी आलेल्या भाविक भक्तांशी आपल्या रसाळ वाणीतून हितगुज करताना केले

श्री क्षेत्र वेरूळ येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सद्गुरु अक्काताई महाराज श्री मच्छिंद्रनाथ बडे बाबा, श्री क्षेत्र नाथ आश्रम वेरूळ यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ह भ प भागवत चार्य वर्षाताई महाराज मस्के सोनवाडी कर यांचे कीर्तन सेवा संपन्न झाली.

त्यांच्या कीर्तनातून भगवंताचे नामस्मरण, भक्ती, सदाचार आणि व्यसनमुक्त एकत्रित कुटुंब पद्धत जीवनाचा सार आणि साधुसंतांच्या संगतीतून मनुष्य जीवन चे कल्याण होते कीर्तनाचे शेवटी मच्छिंद्रनाथ भगवान जय जयकार करून या कीर्तन सोहळ्याची सांगता झाली

भाविकांची मोठी उपस्थिती होती भक्तिरसाचा आनंद धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आकाश अशोक बनसोडे यांनी महाप्रसादाची व्यवस्था केली. तसेच कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने विविध भाविकांच्या वतीने. प्रसाद म्हणून मसाला दूध वाटप करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमाला भाविकांची मोठी उपस्थिती होती कार्यक्रमासाठी फुलंब्री पंचायत समितीचे माजी सभापती विवेक चव्हाण वेरूळ मा सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ उद्योजक इसाराम मातकर कन्नड राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष कैलास अकोलकर ह भ प नारायण भांबर्डे ह भ प तुकाराम मते बाबासाहेब रामचंद्र माते गायनाचार्य उत्तमराव बडे. . संजू भाऊ भागवत कल्पना ताई कदम. संतोष पा करपे . सतीश लोखंडे . योगेश निकम ह भ प शांताराम काळे .चंद्रकांत कुबेर प्रताप भोसले गायनाचार्य सारंग साबळे गायनाचार्य नकुल गव्हाणे योगेश राजपूत यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती

पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर मोसंबीच्या बागा उद्ध्वस्त; डॉ मदन मानधने यांनी 500 मोसंबीची झाडे तोडली

तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- पैठण तालुक्यात सध्या पाणीटंचाईचे भीषण संकट निर्माण झाले असून त्याचा सर्वाधिक फटका फळबागायतदार शेतकऱ्यांना बसत आहे. जीवापाड मेहनत घेऊन, प्रसंगी कर्ज काढून आणि वर्षानुवर्षे मुलांप्रमाणे जपलेल्या मोसंबीच्या बागांना पाण्याअभावी अखेरचा श्वास घ्यावा लागत आहे. डोळ्यांसमोर हिरवीगार बाग वाळताना पाहण्यापेक्षा ती स्वतः च्या हाताने तोडण्याची दुर्दैवी वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. चनकवाडी (ता. पैठण) येथील डॉ. मदन मानधने यांनी पाण्याअभावी आपल्या मोसंबीच्या बागेतील तब्बल ५०० झाडे तोडून टाकली आहेत. या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

"मोठ्या कष्टाने आणि जिद्दीने मोसंबीची बाग उभी केली होती. प्रत्येक झाडाला लेकराप्रमाणे जपले. मात्र, गोदावरी नदीतून पाणी मिळणे बंद झाल्याने बागेला पाणी देता आले नाही. डोळ्यांसमोर झाडे वाळताना पाहणे असह्य झाले. बाग जगविण्यासाठी प्रयत्न करूनही पाणी उपलब्ध झाले नाही. अखेर नाईलाजाने ५०० झाडे तोडावी लागली. झाडे तोडताना मनाला प्रचंड वेदना झाल्या. शेतकऱ्यांनी एवढ्या कष्टाने उभ्या केलेल्या बागा पाण्याअभावी उद्ध्वस्त होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे."

— डॉ. मदन मानधने, शेतकरी, चनकवाडी.

चनकवाडी परिसरातील शेतकऱ्यांसाठी गोदावरी नदीचे पाणी फळबागांना जगविण्याचा मोठा आधार होते. मात्र, गोदावरी नदीतून मिळणारा पाणीपुरवठा बंद झाल्याने मोसंबीच्या बागांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पाण्याअभावी झाडांची वाढ खुंटली, बागा वाळू लागल्या आणि हातातोंडाशी आलेले उत्पन्न डोळ्यांसमोर नष्ट होण्याची वेळ आली. अखेर बाग जगविण्यासाठी दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने डॉ. मदन मानधने यांनी आपल्या बागेतील ५०० मोसंबीची झाडे तोडण्याचा कठोर निर्णय घेतला.

एका झाडाची लागवड केल्यापासून ते फळधारणेपर्यंत शेतकरी अनेक वर्षे मेहनत घेत असतो. खते, औषधे, मशागत, मजुरी आणि पाण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. मात्र, एवढा खर्च करून उभी केलेली बाग पाण्याअभावी तोडावी लागणे, हे शेतकऱ्यांसाठी केवळ आर्थिक नुकसान नसून भावनिक आघातही आहे. बागेतील प्रत्येक झाडाशी शेतकऱ्याच्या कष्टाच्या आणि अपेक्षांच्या आठवणी जोडलेल्या असतात. आज त्याच झाडांवर कुऱ्हाड चालविण्याची वेळ आली आहे. पाणीटंचाईचा फटका केवळ पिकांना नाही, तर शेतकऱ्यांच्या भवितव्यालाही बसत आहे. मोसंबी, डाळिंब यांसारख्या फळबागा उभ्या करण्यासाठी शेतकरी वर्षानुवर्षे गुंतवणूक करतात. मात्र, पाण्याचे नियोजन कोलमडले की त्यांचे संपूर्ण आर्थिक गणित बिघडते. चनकवाडीतील ही घटना पैठण तालुक्यातील फळबागायतदारांसमोरील गंभीर संकट अधोरेखित करणारी आहे.

रस्ता सुरक्षेसाठी आरआर काबेलचा पुढाकार; संभाजीनगरात 10 वाहतूक पोलीस बूथ

'रोशनी' उपक्रमातून 3 हजारांहून अधिक विद्यार्थी, नागरिकांमध्ये जनजागृती; पुणे, नाशिकमध्येही मोहीम

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यासाठी आरआर काबेलच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम 'रोशनी'च्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगरात राबविण्यात आलेली रस्ता सुरक्षा मोहीम पूर्ण झाली. या मोहिमेंतर्गत शहरात १० नवीन वाहतूक पोलीस बूथ उभारण्यात आले असून, ३ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि नागरिकांपर्यंत वाहतूक सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला.

आरआर काबेलने एलिक्सिर फाउंडेशनच्या सहकार्याने ही मोहीम राबविली. वाहतूक नियमांचे पालन, पादचाऱ्यांची सुरक्षा आणि प्रथमोपचार पद्धतींबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. अतिवेग, मद्यपान करून वाहन चालविणे तसेच वाहतुकीतील असुरक्षित सवयी टाळण्याबाबतही प्रबोधन करण्यात आले. मोहिमेचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पोलीस बूथवर जनजागृतीपर फलक लावण्यात आले.

वाहतूक पोलिसांना कामकाजासाठी सुविधा मिळण्यासोबतच हे बूथ अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत मदत आणि मार्गदर्शन केंद्र म्हणूनही उपयोगी ठरणार आहेत. या उपक्रमांतर्गत पुणे शहरात ५५, नाशिकमध्ये २०, तर छत्रपती संभाजीनगरात १० वाहतूक पोलीस बूथ उभारण्यात आले. प्रकल्पाची सांगता अधिकृत हस्तांतरण सोहळ्याने झाली.

आरआर ग्लोबलच्या संचालिका कीर्ती काब्रा यांनी रस्ता सुरक्षा हे सामूहिक ध्येय असल्याचे सांगितले. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि रस्ते सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांना सहकार्य करणे, हा मोहिमेचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. सुरक्षित आणि जबाबदार शहरे घडविण्यासाठी संस्थेचे प्रयत्न सुरू राहतील, असेही त्यांनी सांगितले.

पंचायत समिती व गटशिक्षणाधिकारी कार्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२६ ऑक्टोबर - पंचायत समिती कन्नड तसेच गटशिक्षणाधिकारी कार्यालयात महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.पंचायत समिती येथे सहाय्यक गटविकास अधिकारी व्ही. पी. पंडित, सहाय्यक प्रशासन अधिकारी कोलमवाड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनिषा पाटील, विस्तार अधिकारी शेख, चौधे, बागुल, वरिष्ठ सहाय्यक वासने, लिंगायत, गिते, बोरसे, घरटे, सूर्यवंशी, जाधव, ठाकूर तसेच परिचर अल्ताफ आणि मुजीब यांची उपस्थिती होती.

गटशिक्षणाधिकारी कार्यालयात नीलम परदेशी, आस्थापना शाखेतील संदीप कुलकर्णी, समग्र शाखेतील संदीप कुलकर्णी, विशेष शिक्षक प्रशांत अहिरराव, गंगोले आणि दीपा धारिवाल उपस्थित होते. महर्षी वाल्मिकी यांनी रामायणाच्या माध्यमातून भारतीय साहित्य व संस्कृतीला मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्याचे स्मरण करून उपस्थितांनी अभिवादन केले.

शेतात काम करताना 20 वर्षीय तरुणाला सर्पदंश

कन्नड : दि.२६ ऑक्टोबर - शेतात काम करत असताना दि.२६ सोमवार रोजी सायंकाळी पायाला सर्पदंश झाल्याने भांबरवाडी येथील २० वर्षीय तरुणाला पुढील उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. सतीश संजय राठोड असे तरुणाचे नाव आहे.

सतीश राठोड हे शेतात काम करत असताना त्यांच्या पायाला सर्पदंश झाला. त्यानंतर त्यांना तातडीने कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. रुकसार खान यांनी त्यांची तपासणी केली. प्राथमिक तपासणीनंतर पुढील उपचारांसाठी त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात अवघड वळणावर खाजगी बस ट्रक समोरासमोर अपघात

तभा वृत्तसेवा

फर्दापूर : फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात दर्गा जवळील अवघड वळणावर खाजगी बस ट्रक समोरासमोर अपघात रविवार संध्याकाळी साडेचार वाजता जालना हुन नंदुरबार सळई घेऊन जाणारा ट्रक एम एच 21 2797 आणि अजिंठा लेणी पाहून जाणारी शिर्डी खाजगी बस आर जे पी जी 1640 यांचा अवघड वळणावर समोरासमोर अपघात झाला यात अशी माहिती मिळाली की खाजगी बस एका अवघड वळणावर ओव्हरटेक करताना समोरून येणाऱ्या ट्रकला जाऊन धडकला असुन यात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या दोन्ही

गाड्या अवघड वळणावर उभ्या राहिल्या मुळे घाटात मोठ्या प्रमाणात ट्राफिक जाम झालीं होती यामुळे काही पर्यटकांनी सोयगाव मार्ग हाळदा हुन तसेच काही प्रवासी तोंडापूर मार्ग साधून निघाले काही प्रवासी दोन तास ट्रॅफिक मध्ये अडकले होते यावेळी अजिंठा पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी ताबडतोब मॅकनिक बोलून खाजगी बस दुरूस्त करून घाटाच्या वर पोहच करण्यात आली यामुळे घाटात एकेरी वाहतूक सुरळीत करण्यात आली या खाजगी बस मध्ये एकूण बावन प्रवाशी होते हि समोरासमोर धडक होताच यातील प्रवाशी किरकोळ जखमी झाले होते ऑक्टोंबर महिन्यात घाट जाम होण्याची सहावी घटना घडली आहे तरी या घाटात बेजबाबदार वाहने चालविणे यांच्या वर कडक कारवाई करण्यात यावी जेणेकरून नाहाक प्रवाशी यांना चार ते पाच घाटात ट्राफीक जाम मध्ये आटकून बसावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मागणी वाहतूकदार करीत आहेत यावेळी घटना स्थळी अजिंठा पोलीस स्टेशनचे सहा पोलीस निरीक्षक पवन इंगळे उप निरीक्षक बाळासाहेब भवर, रघुनाथ शिंदे, दिपक पाटील, संतोष पाईकराव, विजय पवार,जफर पठाण, मंगेश आरके यांनी तात्काळ एकेरी वाहतूक सुरळीत चालू करण्यात आली

प्रेम, नाती आणि भन्नाट गोंधळाची गोष्ट 'सासरे बापरे'!

5 फेब्रुवारीला रंगणार नात्यांची भन्नाट गोष्ट.

छत्रपती संभाजीनगर - प्रेमकथा म्हटलं की, सगळं काही सुरळीत आणि परफेक्ट असावं, असं नाही. प्रेमासोबत येणारा गोंधळ, नात्यांमधले मतभेद, एकमेकांना समजून घेण्याची धडपड आणि या सगळ्यात कुटुंबाची होणारी मजेशीर घुसमट... अशाच काहीशा भन्नाट आणि हळुवार नात्यांची गोष्ट घेऊन 'सासरे बापरे' हा आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा झाली असून 'सासरे बापरे' हा चित्रपट येत्या ५ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. 'एक बाप... आणि एक बाप लव्हस्टोरी!' अशी कॅची ओळ घेऊन येणाऱ्या या चित्रपटाचं शीर्षकच उत्सुकता वाढवणारं आहे. नावातला मिश्कीलपणा आणि त्यामागची कौटुंबिक गोष्ट यामुळे 'सासरे बापरे'मध्ये नेमकं काय पाहायला मिळणार, याची उत्सुकता पहिल्याच घोषणेत निर्माण झाली आहे.

आयडीएफसी फर्स्ट बँकेला 1,045 कोटींचा नफा

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीचे लेखापरीक्षण न केलेले आर्थिक निकाल जाहीर केले. बँकेने आर्थिक वर्ष 2026-27 च्या दुसऱ्या तिमाहीत रु 1,045 कोटींचा निव्वळ नफा (पीएटी) नोंदवला. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत नफ्यात 196.5% वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या सहामाहीत बँकेचा करपश्चात नफा रु 2,120 कोटी इतका राहिला, तर मालमत्तेवरील परतावा (आरओए) 0.99% नोंदवण्यात आला. निकालांवर भाष्य करताना, बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, "आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीत सलग दुसऱ्यांदा आमचा निव्वळ नफा (पीएटी) रु1,000 कोटींच्या पुढे गेला आहे. तसेच, एस अँड पी ग्लोबल रेटिंग्स या आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थेकडून इन्व्हेस्टमेंट-ग्रेड मिळाल्यामुळे आता आम्हाला आंतरराष्ट्रीय पतमानांकनही प्राप्त झाले आहे. सलग दुसऱ्या तिमाहीत आमच्या ओपेक्स खर्चातील वाढ ही उत्पन्नातील वाढीपेक्षा सुमारे 500 बेसिस पॉइंट्सने कमी राहिली आहे.

महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि. 26 (जिमाका) : जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या महान कार्याचे, साहित्यिक योगदानाचे तसेच भारतीय संस्कृती आणि साहित्यविश्वातील त्यांच्या महत्त्वपूर्ण स्थानाचे स्मरण करण्यात आले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडा, खानदेशातील पाच हजार मंदिरांत स्वच्छता अभियान

विश्व हिंदू परिषदेतर्फे 31 ऑक्टोबर व 1 नोव्हेंबरला उपक्रम; मंदिरांची स्वच्छता, रोषणाई, भगव्या ध्वजाचे पूजन

छत्रपती संभाजीनगर : दीपावलीच्या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयाम, देवगिरी प्रांतातर्फे ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी मंदिर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. मराठवाडा आणि खानदेशातील १४ जिल्ह्यांमधील किमान पाच हजार मंदिरांमध्ये हे अभियान राबविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये मंदिरांसह बौद्ध विहार, जैन स्थानके आणि गुरुद्वारांचाही सहभाग अपेक्षित आहे.

'माझे मंदिर, माझी जबाबदारी' या संकल्पनेतून 'मंदिराचा गाभारा ते अंगण' या उपक्रमांतर्गत दोन्ही दिवसांपैकी सोयीच्या एका दिवशी सकाळी ७ ते ११ या वेळेत चार तास श्रमदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भाविक, धार्मिक संघटना, सेवाभावी संस्था, मंदिर विश्वस्त, पुरोहित, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणांनी आपल्या जवळच्या मंदिरात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छतेसोबतच मंदिरांमध्ये दीपावलीनिमित्त रोषणाई करून परिसर प्रकाशमय व आकर्षक करण्यात येणार आहे. तसेच मंदिरांवरील जुने भगवे ध्वज बदलून नवीन ध्वजांची प्रतिष्ठापना करण्यात येईल. ध्वज लावण्यापूर्वी हिंदू समाजातील विविध घटकांतील तरुण जोडप्यांच्या हस्ते ध्वजपूजन करण्यात येणार असून, त्यातून सामाजिक समरसता व एकतेचा संदेश दिला जाणार आहे.

विश्व हिंदू परिषदेचे हे अभियान चौथ्या वर्षात पदार्पण करत आहे. जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेसह विविध संस्था-संघटनांच्या माध्यमातून अनेक मंदिरांमध्ये स्थायी स्वच्छता गट कार्यरत झाले आहेत. महिला विश्वस्त, महिला पुरोहित आणि भाविकांचाही या अभियानात सहभाग आहे. संत-महंतांनीही अभियानाचे कौतुक करून सहभागाचे आवाहन केले आहे.

मंदिरे केवळ दर्शनाची केंद्रे न राहता स्वच्छता आणि सेवाकार्याची केंद्रे व्हावीत, हा या अभियानाचा उद्देश आहे. 'सत्यम शिवम सुंदरम' या तत्त्वानुसार पर्यावरणविषयक संस्था, स्वच्छता अभियानातील कार्यकर्ते आणि भाविकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांत अध्यक्ष संजय गायकवाड, प्रांतमंत्री योगेश्वरजी गर्गे, सहमंत्री ललित चौधरी, काशिनाथ दापके, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार, सहप्रमुख आनंदीदास रहाटीकर आणि यज्ञेश्वर जोशी यांनी केले आहे.

सुशिक्षित बेरोजगारांनी जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेसाठी अर्ज करावेत

छत्रपती संभाजीनगर, दि. 26 (जिमाका) : जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेअंतर्गत सन 2026 - 27 या आर्थिक वर्षासाठी उद्दिष्ट प्राप्त झाले असून, पात्र सुशिक्षित बेरोजगारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे उप आयुक्त (उद्योग व सेवा) यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत अर्जांचे वाटप व स्वीकारण्याची प्रक्रिया दि. 11 मे 2026पासून सुरू आहे. प्राप्त अर्जांमधील पात्र कर्ज प्रकरणे बँकांकडे शिफारशीसाठी पाठविण्यात येणार आहेत. अर्ज वाटप व स्वीकारण्याची अंतिम तारीख दि. 30 नोव्हेंबर 2026 असून, अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी 11 ते दुपारी 2 वाजेपर्यंत आहे. तरी इच्छुक सुशिक्षित बेरोजगारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

आयएनएस मंगरोल नौदलात दाखल

मुंबई,: भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या प्रयत्नांदरम्यान, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया ने देशाच्या नौदल आधुनिकीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय नौदलाच्या माहे-क्लासमधील तिसऱ्या अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट आयएनएस मंगरोलला नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले आहे.एएम/एनएस इंडियाने पुरवलेल्या 100% विशेष स्टीलपासून तयार करण्यात आलेल्या आयएनएस मंगरोलला 12 ऑक्टोबर 2026 रोजी मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले. ही उपलब्धी भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राला आणि सागरी सुरक्षेला बळकटी देण्यात प्रगत भारतीय स्टील उत्पादनाचे वाढते योगदान अधोरेखित करते.

हिबा नवाब साकारणार एक लाडकी चेटकीण

सोनी सब आपल्या आगामी कौटुंबिक सिटकॉम चुडैल चली ससुराल द्वारे प्रेक्षकांसाठी हास्य, प्रेम आणि जादुई गोंधळाचा मनोरंजक संगम घेऊन येण्यास सज्ज आहे. ही मालिका लोकप्रिय कथेला भारतीय अंदाजात नव्या स्वरूपात सादर करत असून, दैनंदिन कौटुंबिक क्षणांना कल्पनारम्य जादूची जोड देते. या मोहक कथेच्या केंद्रस्थानी अभिनेत्री हिबा नवाब असून, ती उर्वशीची भूमिका साकारणार आहे. जादुई दुनियेतील तिचा प्रवास वैवाहिक आयुष्यापर्यंत पोहोचताना अनेक मनोरंजक घडामोडी घडवून आणणार असून, प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करणार आहे.

आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर केली

मुंबई: दिवाळी म्हणजे रोषणाई, एकत्र येणे आणि प्रत्येक क्षण खास बनवणाऱ्या माणसांचा उत्सव. दिवाळीमध्ये विचारपूर्वक निवडलेली भेटवस्तू प्रेम, कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याचे माध्यम बनते. यंदा दिवाळीत शॉपर्स स्टॉप या भारतातील प्रीमियम फॅशन, ब्युटी आणि भेटवस्तूंच्या आघाडीच्या गंतव्याने 'गिफ्ट्स ऑफ लव्ह'च्या माध्यमातून भेटवस्तू देण्याच्या आनंदाला अधिक उत्साहवर्धक केले आहे. हे खास सणासुदीच्या भेटवस्तूंचे कलेक्शन आहे, जे या सणाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या अनेक नात्यांना साजरे करते.

एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसमध्ये स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर,दि.२६ : एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसच्या मेडिकल रेडिओलॉजी अँड इमेजिंग टेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने ऑक्टोबर महिन्यात साजऱ्या होणाऱ्या स्तनाच्या कर्करोग जनजागृती महिन्यानिमित्त स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्तनाच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे

ओळखणे, लवकर निदानाचे महत्त्व समजावून सांगणे आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत जागृती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचे स्तनाच्या कर्करोगावरील शस्त्रक्रिया तसेच पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ डॉ. आशुतोष तोंडारे यांनी मार्गदर्शन केले. स्तनाच्या आरोग्याची काळजी घेणे, स्तनांमध्ये जाणवणारे असामान्य बदल किंवा संभाव्य धोक्याची लक्षणे वेळीच ओळखणे आणि अशी लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात स्तन तपासणीच्या प्रतिकृतीच्या साहाय्याने प्रात्यक्षिक करण्यात आले. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना स्तन तपासणीविषयी प्रात्यक्षिक स्वरूपात माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली. याशिवाय, विविध जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यात आला. स्तनाच्या आरोग्याविषयी अचूक माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वही या वेळी अधोरेखित करण्यात आले. 'जाणा, स्पर्शातून ओळखा, लक्षणे ओळखा आणि कृती करा' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमातून स्तनाच्या आरोग्याविषयी जागरूकता, असामान्य बदलांची वेळीच ओळख आणि योग्य वेळी वैद्यकीय सल्ला घेण्याचा संदेश देण्यात आला. एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसचे प्राचार्य डॉ. संजय गुड्डेतवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मेडिकल रेडिओलॉजी अँड इमेजिंग टेक्नॉलॉजी विभागाच्या प्राध्यापिका निशा पी. गोविंदानी आणि ऋतुजा उकिर्डे यांनी कार्यक्रमाच्या संयोजक म्हणून काम पाहिले. सर्व प्राध्यापकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

अग्रलेख

औषधांचा जीवघेणा खेळ...

पहिली घटना २०२२ मधील. पश्चिम आफ्रिकेतील गांबिया नावाच्या छोट्या देशात किडनी निकामी होऊन ७० बालकांचा मृत्यू झाला. या बालमृत्यूंचा संबंध भारतात बनवलेल्या खोकल्याच्या औषधाशी जोडला गेला. दुसरी घटना गेल्या वर्षीची; मध्य प्रदेशात खोकल्याच्या औषधामुळेच लहान मुले दगावल्याचे उघडकीस आले. अर्थातच, हे औषधही देशातच तयार झालेले होते. या दोन घटनांच्या आगेमागे एक मोठी आणि सकारात्मक घटना घडली होती. सगळे जग कोरोना महामारीशी झुंजत असताना, भारत स्वतःच विकसित केलेल्या लसी मोठ्या प्रमाणात अन्य देशांना पाठवत होता. या लसींमुळे देशातील नागरिकांप्रमाणेच जगभरातील कोट्यवधी लोकांचे जीव वाचले. भारतातील फार्मा इंडस्ट्री अर्थात औषधनिर्माण उद्योगाची दोन रूपे दाखवणारी ही काही प्रतीकात्मक उदाहरणे. देशात तयार होणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेविषयी अलिकडेच समोर आलेल्या एका धक्कादायक वास्तवाने या उद्योगाच्या अशा क्षमता आणि मर्यादांकडे साहजिकच लक्ष वेधले आहे. देशातील विविध कंपन्यांनी तयार केलेल्या ३३० औषधांचे नमुने निर्धारित गुणवत्ता मानकांनुसार नसल्याचे सरकारच्या औषध प्रयोगशाळांनी सप्टेंबरमध्ये केलेल्या तपासणीतून उघड झाले आहे. यातील ४२ नमुने केंद्रीय, तर २८८ नमुने राज्यांच्या औषध प्रयोगशाळांनी अयोग्य ठरविले आहेत. त्याचप्रमाणे, दिल्लीतील एका औषधाचा नमुनाच बनावट असल्याचे आढळले आहे. या घटनेमुळे औषधनिर्मिती प्रक्रियेतील गुणवत्ता आणि सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. औषधांच्या गुणवत्तेबाबत होणारी तडजोड हा केवळ नियमभंग नव्हे, तर रुग्णांच्या जीविताशी केलेला खेळ आहे. औषधनिर्मितीच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता बनण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या भारतातच असे शेकडो औषधांचे नमुने गुणवत्ता चाचणीत बाद ठरत असतील, तर या विषयाचे गांभीर्य अनेक पटींनी वाढते. हा प्रश्न केवळ संबंधित औषधांच्या विशिष्ट बॅचपुरता सीमित नाही. त्याची व्याप्ती जनतेचे आरोग्य, यंत्रणेची कार्यक्षमता, नियंत्रक-नियामक व्यवस्थेचे उत्तरदायित्व आणि औषध उद्योगातील नफेखोरीपर्यंत विस्तारलेली आहे. त्यामुळे या अहवालातील तथ्याकडे नुसते आकडे म्हणून न पाहता लोकांच्या आरोग्याला असलेला धोका म्हणून बघितले पाहिजे.

वास्तविक एखादे औषध मानकांनुसार नसणे आणि ते बनावट असणे यामध्ये मूलतः फरक आहे. औषधातील विशिष्ट घटकांचे प्रमाण ठरावीक मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असेल, त्यांची शुद्धता मापदंडाप्रमाणे नसेल, औषधाची शरीरात विरघळण्याची क्षमता निकषांनुसार नसेल, उत्पादन प्रक्रियेत दोष असेल, तर ते गुणवत्ता चाचणीत बाद होऊ शकते. बनावट औषधामध्ये वापरलेले घटक मुळातच दुय्यम किंवा कमअस्सल असू शकतात. अनेकदा दुसऱ्या कंपनीच्या ब्रँडचा गैरवापर करून अशी औषधे बाजारात आणली जातात. या दोन्ही प्रकारच्या औषधांचा रुग्णाला धोका होऊ शकतो. एखाद्या संसर्गावरचे औषध परिणामकारक नसेल, तर तो आजार बळावू शकतो. विशेषतः मधुमेह, रक्तदाब आणि हृदयविकाराच्या औषधांतील असे दोष गंभीर गुंतागुंत निर्माण करू शकतात. अशा औषधांमुळे रुग्णाचे अवयव निकामी होण्यापासून मृत्यूपर्यंतचे परिणाम होऊ शकतात. दुसरीकडे, बनावट औषधांमुळे रुग्णाला उपचार तर दिला जात असल्याचे दिसते, पण प्रत्यक्षात औषधाचा परिणाम होत नसल्याने त्याचा आजार तसाच राहण्याचा आणि भविष्यात आणखी वाढण्याचा धोका असतो. तथापि, या एका अहवालावरून देशात तयार होणाऱ्या सर्वच औषधांच्या गुणवत्तेविषयी सरसकट निष्कर्ष काढणेही योग्य होणार नाही. औषधांची निर्धारित मानके पूर्ण न करण्याचे प्रकार वारंवार घडत असतील, तर मात्र त्यामागील कारणांचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई व्हायला हवी. त्यासाठी १९४० चा औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायदा तसेच १९४५ च्या औषधविषयक नियमांतील तरतुदींनुसारच औषधांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियंत्रण ठेवले जाते. त्यातही औषधांच्या सुयोग्य उत्पादन पद्धतींसाठी काही तरतुदी केलेल्या आहेत. औषध कंपन्यांच्या प्रयोगशाळेत होणाऱ्या चाचण्या, औषध उत्पादन होणाऱ्या ठिकाणची स्वच्छता, यंत्रसामग्री, रसायने व अन्य घटकांचा दर्जा आणि त्यांची चाचणी, प्रदूषणकारक घटकांचे नियंत्रण, उत्पादनाच्या नोंदी आणि गुणवत्ता नियंत्रण अशा महत्त्वाच्या बाबींचा त्यामध्ये समावेश आहे. या नियमांनुसार उत्पादन होत नसेल, तर संबंधित औषधाच्या विक्रीवर निर्बंध घालणे, विशिष्ट बॅच बाजारातून परत मागविणे, उत्पादनाचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्यासह नियमभंगाच्या स्वरूपानुसार फौजदारी कारवाई करता येते. औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यातील कलम २७ नुसार बनावट किंवा भेसळयुक्त औषधांच्या गंभीर प्रकरणांमध्ये दंड आणि कठोर कारावासाचीही तरतूद आहे.

नियम-कायद्यांमध्ये एवढी स्पष्टता असताना औषधांच्या मानकांशी तडजोड केली जाण्याच्या, बनावट औषधे तयार होण्याच्या घटना घडतात कशा, असा प्रश्न पडतो. अशा घटनांची जबाबदारी नेमकी कुणाची? औषध उत्पादक कंपन्यांची की ती प्रमाणित करणाऱ्या यंत्रणांची? पुरवठादार-वितरकांची की आरोग्य विभागाची? प्रत्येक वेळी निष्पाप रुग्णांचा जीव गेल्यानंतरच यंत्रणेला जाग येणार असेल, तर नियामक किंवा नियंत्रक व्यवस्थांचा उपयोग काय? तपासण्यांमध्ये शेकडो औषधे मानकांनुसार नसल्याचे किंवा बनावट असल्याचे आढळते, याचा अर्थ या व्यवस्था पूर्ण जबाबदारीने काम करीत नाहीत. 'एफडीए' अर्थात अन्न-औषध प्रशासनाच्या मोहिमांमुळे महाराष्ट्रात आजकाल या विभागाची बरीच चर्चा होते. अलिकडे या विभागाने काही औषध कंपन्यांवरही कारवाई केली. पण, प्रश्न एकूणच देशभरातील औषधांच्या गुणवत्तेचा आहे. देशात औषध निरीक्षकांची संख्या आणि होणाऱ्या तपासण्यांचे प्रमाण पुरेसे आहे का? प्रयोगशाळा सक्षम आहेत का? औषधात दोष आढळल्यावर संबंधित बॅच बाजारातून तातडीने परत मागविली जाते का? तपासणी आणि नोटिसांना नियोजित वेळेत प्रतिसाद न देणाऱ्या कंपन्यांवर कारवाई होते का? या आणि अशा प्रश्नांची उत्तरे केवळ सरकारी खुलाशातून मिळणार नाहीत. त्यासाठी कार्यक्षम आणि पारदर्शक तपासणी यंत्रणा उभारून त्यामार्फत नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल. पुढे जाऊन अशा प्रकारांना जबाबदार असलेल्या दोषींवर केलेल्या कारवाईचे परिणामही जनतेसमोर ठेवावे लागतील.

आजच्या घडीला भारत जगातील प्रमुख औषधनिर्माता देशांपैकी एक आहे. जेनेरिक औषधांच्या जागतिक पुरवठ्यातही भारताचा मोठा वाटा आहे. वेगवेगळ्या लसींचे उत्पादन, स्वस्त औषधांची उपलब्धता आणि निर्यात यांमुळे भारतीय औषध उद्योगाने आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. मात्र, भारताच्या औषधांवर जगाचा विश्वास वाढत असल्यामुळे औषध कंपन्या आणि सरकार या दोघांचीही गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी अधिक वाढली आहे. या उद्योगाच्या आर्थिक सामर्थ्यामुळे प्रसंगी गुणवत्तेत तडजोड करण्यासाठी किंवा नियम शिथिल करण्यासाठी दबाव येण्याची शक्यताही असतेच. अशा स्थितीत, गुणवत्तेशी तडजोड केल्यास प्रचंड आर्थिक नुकसान आणि कठोर शिक्षा होण्याची भीती औषध कंपन्यांना असली पाहिजे. भारताला 'जगाची फार्मसी' बनायचे असेल, तर केवळ स्वस्त औषधांचा पुरवठादार म्हणून नव्हे, तर सुरक्षित आणि विश्वासार्ह औषधांची हमी देणारा देश अशी ओळख निर्माण करावी लागेल. औषध कंपन्यांचा नफा हा त्यांच्या व्यवसायाचा विषय असू शकतो; पण औषधांची गुणवत्ता हा लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने देशाचे आरोग्य जपण्यासाठी लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या अशा कंपन्यांना त्या त्या वेळी कठोर कारवाईचा 'डोस'ही दिला पाहिजे. ■

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

निवडणुकींचे दोन मंगळवार!

दोन मंगळवार जगाचे 'मंगल-अमंगल' ठरविणार आहेत. इस्त्रायलची सार्वत्रिक निवडणूक उद्या मंगळवारी होत असून, पुढील मंगळवारी अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होत आहेत. आणि या दोन निवडणुकांचे निकाल जगाच्या राजकारणाला-युद्धकारणाला प्रभावित करणार आहेत. युद्धातील विजय नेहमीच निवडणुकीतही विजय मिळवून देतो असे नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या रणांगणात ब्रिटनला विजय मिळवून देणाऱ्या विन्स्टन चर्चिल यांना ब्रिटनच्या मतदारांनी निवडणुकीच्या रिंगणात पराभूत केले होते.

इस्त्रायलची निवडणूक : 'नेसेट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इस्त्रायली संसदेत १२० जागा असून, उद्या होणाऱ्या मतदानात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता नसल्याचे मानले जाते.

पंतप्रधान नेत्यानाहू यांच्या लिकुड पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी आणि माजी लष्करी अधिकारी गादी आइजेनकोट यांनी स्थापन केलेल्या याशर पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी हे दोन मुख्य प्रतिस्पर्धी निवडणुकीच्या मैदानात आहेत.

नेतान्याहू पिछाडीवर : ताज्या जनमत चाचणीत पंतप्रधान नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील आघाडी पिछाडीवर असल्याचे म्हटले जाते. त्यांच्या पक्षाला २१ जागा मिळण्याचा अंदाज वर्तविला जात आहे तर याशर पक्षाला दोन जागा जादा म्हणजे २३ जागा मिळण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. नेतान्याहू यांच्या आघाडीला १२० पैकी ४९ जागा मिळतील असे म्हटले जात आहे तर त्यांचे प्रतिस्पर्धी गादी आइजेनकोट यांच्या आघाडीला ५४ जागा मिळण्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

युद्धाचा विरोध : ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायलमध्ये मोठा दहशतवादी हल्ला केल्यानंतर नेतान्याहू सरकारने हमास या दहशतवादी संघटनेविरोधात युद्ध सुरू केले आणि गाझा पट्टी जवळपास बेचिराख केली. त्यांच्या या निर्णयाचे काही देशांत कौतुक झाले असले तरी इस्त्रायलमध्ये मात्र मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. विशेषतः हमासने अपहरण केलेल्या सर्व इस्त्रायली नागरिकांची सुखरूप सुटका करविण्यात नेतान्याहू सरकार अपयशी ठरले असे स्थानिक लोकांना वाटत आले आहे.

हमासची मनधरणी : इस्त्रायली नागरिकांची सुटका करण्यासाठी नेतान्याहू सरकारला हमासची अक्षरशः मनधरणी करावी लागली आणि एका नागरिकाला सोडविण्याच्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर हमासच्या अतिरेक्यांना सोडावे लागले. इस्त्रायली तुरुंगात १०-२० वर्षांपासून बंदिस्त असलेल्या काही कुख्यात अतिरेक्यांना सरकारला सोडावे लागले ही वस्तुस्थिती आहे.

'आर्यन डोम' दुभंगला? : इस्त्रायलने आपल्या हवाई सरंक्षणासाठी 'आर्यन डोम' नावाची सुरक्षा प्रणाली उभारली आहे. इस्त्रायलचे आकाश अभेद्य आहे आणि परिणामी इस्त्रायलची भूमी सुरक्षित आहे असा दावा आजवर केला जात होता. हमासने व इराणने तो दावा खोटा ठरविला. जवळपास तीन वर्ष इस्त्रायलचे हमासशी युद्ध सुरू होते. नंतर यावर्षी फेब्रुवारीत इस्त्रायलने इराणवर हल्ला चढविला. त्याचा विरोध म्हणून इराणने इस्त्रायलच्या 'आर्यन डोम'ला भेदून अनेक शहरांवर यशस्वी हल्ले चढविले. मागील तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या युद्धास इस्त्रायली जनता कंटाळली असल्याचे मानले जाते. याने देशातील महागाई वाढली आहे हेही जनतेच्या नाराजीचे एक कारण आहे. या साऱ्याचा परिणाम पंतप्रधान नेत्यानाहू यांना व त्यांच्या पक्षाला भोगावा लागू शकतो असा अंदाज वर्तविला जात आहे.

१८ महिन्यांत हमासचा निकाल : पंतप्रधान नेतान्याहू यांचे मुख्य प्रतिस्पर्धी व पंतप्रधानपदाचे दावेदार गादी हे इस्त्रायली लष्कराचे एक नामांकित व प्रतिष्ठित लष्करी सेनापती आहेत. त्यांनी आपण सत्तेवर आल्यास १८ महिन्यांत गाझा पट्टीतील हमासचे शासन संपवू असे आश्वासन इस्त्रायली जनतेला दिले आहे. नेतान्याहू सरकारचे धोरण पूर्णपणे अपयशी ठरले असून, इस्त्रायलच्या जनतेने आपल्याला सरकार बनविण्याची एक संधी द्यावी असे आवाहन ते करीत आहेत.

बहुमत न मिळाल्यास : इस्त्रायल निवडणुकीत कोणत्याही आघाडीला बहुमताचा ६१ चा आकडा गाठता येणार नाही असा अंदाज स्थानिक राजकीय विश्लेषक नोंदवित आहेत. आणि ही स्थिती नेतान्याहू यांच्यासाठी फायद्याची ठरणार आहे. कारण, इस्त्रायली घटनेनुसार सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही पक्षास स्पष्ट बहुमत न मिळाल्यास पंतप्रधान आपल्या पदावर कायम राहतात व ते काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम करतात. नेतान्याहू यांच्यासाठी ही एक जमेची बाजू ठरणार आहे.

अमेरिकेतील मध्यावधी : दर चार वर्षांनी येणाऱ्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची निवडणूक होते आणि बरोबर दोन वर्षांनी पुन्हा नोव्हेंबरच्या पहिल्या मंगळवारी मध्यावधी निवडणूक होते. ती आता ३ नोव्हेंबर रोजी होत असून, यात अमेरिकन काँग्रेसच्या सर्व ४३५ जागा, सिनेटच्या एक तृतीयांश म्हणजे ३३ जागा आणि ५० पैकी दोन तृतीयांश म्हणजे ३४ राज्यांचे गव्हर्नर निवडले जातात.

रिपब्लिकन पिछाडीवर : ताज्या जनमत चाचणीनुसार अमेरिकन काँग्रेसच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्ष पिछाडीवर असून, डेमोक्रॅटिक पक्षाला ४३५ सदस्याच्या सभागृहात स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता आहे. अशीच स्थिती सिनेट व राज्यांचे गव्हर्नर यांच्याबाबतीत राहण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. असे निकाल लागल्यास राष्ट्रपती ट्रम्प यांची स्थिती फारच अवघड होणार आहे. जगात त्यांच्या प्रतिमेला जबर धक्का बसेलच शिवाय त्यांना मोठे निर्णय घेणे अवघड जाणार आहे.

मोठा गतिरोध : राष्ट्रपती ट्रम्प यांच्या पक्षाने अमेरिकन काँग्रेस व सिनेट या दोन्ही सभागृहांमधील आपले बहुमत गमावल्यास, ट्रम्प यांना नवे कायदे करणे अशक्य होईल. शिवाय ट्रम्प प्रशासनाच्या खर्चावर दोन्ही सभागृहांचेच नियंत्रण असते. याचा परिणाम म्हणजे ट्रम्प यांना आपल्या आवडत्या योजना राबविता येणार नाहीत.

दुसरा परिणाम म्हणजे डेमोक्रॅटिक पक्ष आपल्या इच्छेने दोन्ही सभागृहांत कायदे पारित करवून घेऊ शकतो. पण या विधेयकांना नाकारण्याचा अधिकार म्हणजे व्हेटो राष्ट्रपतींच्या हाती राहत असल्याने ट्रम्प या कायद्यांना मंजुरी देणार नाहीत. दोन्ही सभागृहांत दुसऱ्या पक्षाजवळ दोन तृतीयांश बहुमत असेल तर मात्र राष्ट्रपतींचा व्हेटो निष्प्रभ होतो आणि तो कायदा अमलात येतो. म्हणजे या निवडणुकीनंतर एक प्रकारचा घटनात्मक गतिरोध अमेरिकेत तयार होण्याची चिन्हे आहेत.

जगाच्या पथ्यावर? : मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांच्या पक्षाला समधानकारक यश न मिळाल्यास, त्यांची मनमानी संपुष्टात येईल. हा त्यांचा व्यक्तिगत पराभव मानला जाईल. राष्ट्रपती ट्रम्प यांनी 'नाटो'ला मोडीत काढले आहे. आता तर त्यांनी रशियाशी हातमिळवणी केली आहे. इराणसोबत त्यांचा संघर्ष सुरू आहे. इराणच्या विरोधात त्यांनी 'महाबॉम्ब' म्हणजे 'मदर ऑफ ऑल बॉम्ब' असे एक अतिशय घातक शस्त्र वापरण्याचा विचार सुरू केला आहे. इराणने याला 'फादर ऑफ मिसाईल्स' या घातक क्षेपणास्त्राने उत्तर देण्याची घोषणा केली आहे. दुसरीकडे युद्धाच्या झळा इराणी जनतेसोबतच अमेरिकन जनतेला बसत आहेत. युद्धाचे आर्थिक फटके अमेरिकेला बसू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांच्या पक्षाचा पराभव झाल्यास ती अमेरिका, भारत, युरोप व सारे जग यांच्यासाठी एक सुखद घटना असेल. इस्त्रायल हे एक लहानसे राष्ट्र आणि अमेरिका एक बलाढ्य राष्ट्र. या दोन देशांनी संयुक्तपणे सुरू केलेल्या इराण युद्धावर या दोन देशांची जनता कोणता कौल देते हे या निवडणुकीत दिसणार आहे. ■

वेध

पुंडलिक आंबटकर

दिवाळीची चाहूल अन् थंडीची हूल

दिवाळीचा सण जवळ आला की, महाराष्ट्रात हिवाळ्याची चाहूल लागते. साधारणतः ऑक्टोबरच्या अंतिम चरणात हिवाळा प्रकर्षाने जाणवायला सुरुवात होते. २०२४-२०२५ मध्ये महाराष्ट्रासह नागपूर विभागातही अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. परंतु, त्या तुलनेत हिवाळा काही जाणवत नव्हता. अशातच २०२५ च्या अखेरीस अर्थातच डिसेंबर महिन्यात अल निनोच्या प्रभावामुळे आणि हिमालयाकडून शीत लहर दाखल झाल्याने नागपूर, पुणे, मुंबई आणि नाशिकसह संपूर्ण राज्यात एकाएकी तीव्र थंडी जाणवू लागली. पुणे व नाशिकमध्ये तर पारा ७ ते ८ अंशांच्या खाली गेला होता. विदर्भ आणि मराठवाड्यातही हाडे गोठविणारी थंडी पडली होती. यंदा मात्र विदर्भ आणि मराठवाड्यात दुष्काळसदृश स्थिती आहे. ऑक्टोबर महिन्यातच नदी-नाले, विहिरी आणि कूपनिलका कोरड्या पडल्या असून अनेक ठिकाणी पारा ३५ अंशांचा टप्पा ओलांडून ४० अंशांच्या घरात गेला आहे. त्यामुळे यंदा कडक हिवाळ्याची कुठलीच शक्यता वाटत नाही.प्रशांत महासागरात अल निनोची स्थिती मजबूत झाल्याने यंदा हिवाळ्यात सरासरीपेक्षा तापमान अधिक राहील, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. अवर्षणामुळे बाष्पीभवनाची प्रक्रिया घटल्याने वातावरणाचा समतोल बिघडला आहे. याचा परिणाम हिवाळ्यातील थंडीवर होणार आहे. सध्या विदर्भ-मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात रात्री किंचित गारवा जाणवत असला तरी दुपारच्या सुमारास उन्हाचा तडाखा असह्य होऊन जातो. महाराष्ट्रात साधारणतः नोव्हेंबरपासून कडक हिवाळ्याला सुरुवात होते. परंतु, ऑक्टोबरच्या अंतिम चरणातच थंडी जाणवायला सुरुवात होते, हा आजपर्यंतचा इतिहास आहे. परंतु, मागील काही वर्षांपासून ऋतुचक्रच खंडित झाल्याने तीनही ऋतूंवर परिणाम झाला आहे. कधी उन्हाळ्यात मुसळधार पाऊस पडतो तर कधी भर हिवाळ्यात पारा वाढतो.

ऑक्टोबरच्या शेवटी सुरू होणारा हिवाळा पूर्वी होळीपर्यंत अर्थातच मार्च महिन्यापर्यंत जाणवायचा. हाडे गोठविणारी थंडी पडत असल्याने रबी हंगामात चांगले उत्पादन व्हायचे. आता मात्र या सर्वच बाबींवर परिणाम झाल्याने उत्पादनातही घट झाली आहे. डिसेंबर महिन्यात थंडीचा जोर आपल्या अंतिम चरणावर पोहोचतो. यंदा मात्र डिसेंबर महिन्यातही थंडी पडण्याची शक्यता कमी आहे. तसे पाहिले तर नागपूर विभाग कडक उन्हासाठी ओळखला जातो. परंतु, अनेकदा नागपूर शहरासह संपूर्ण विदर्भात ऐतिहासिक थंडीची नोंद झालेली आहे. २ जानेवारी १९९१ आणि २ जानेवारी १९९५ रोजी महाराष्ट्रात ऐतिहासिक थंडीची नोंद करण्यात आली. नागपूर विभागात सर्वाधिक कडक हिवाळा २०१८ मध्ये अनुभवण्यात आला होता. २९ डिसेंबर २०१८ रोजी नागपूर शहरात किमान तापमान ३.१ अंशांच्या खाली घसरले होते. हा ५० वर्षांतील विक्रम ठरला होता. दिवाळीचा सण जवळ आला की वातावरणात उत्साहाबरोबरच थंडीची चाहूल लागते. मात्र, यंदा थंडीचा पत्ता नसल्याने हिवाळ्याची प्रतीक्षा लांबली आहे. बदलत्या हवामानाचा हा परिणाम केवळ ऋतुचक्रापुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद विविध व्यवसायांवरही उमटू लागले आहेत. थंडीच्या आगमनावर अवलंबून असलेल्या गरम कपड्यांच्या व्यवसायाला याचा मोठा फटका बसत आहे. स्वेटर, जॅकेट, मफलर, शाली आणि ब्लँकेट यांसारख्या वस्तूंची मागणी घटल्याने व्यापाऱ्यांची चिंता वाढू लागली आहे. हंगामासाठी केलेली गुंतवणूक आणि साठवलेला माल यामुळे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. हिवाळा म्हटले की लोक पर्यटनाला पसंती देतात. दिवाळीच्या सुट्या आणि आल्हाददायक वातावरण यामुळे दरवर्षी पर्यटक मोठ्या संख्येने निसर्गसौंदर्य असलेल्या ठिकाणी भेटी देतात. पण हवामान बदलाची झळ पर्यटन व्यवसायालाही बसत आहे. थंड हवेची ठिकाणे, हिवाळी पर्यटन आणि निसर्गरम्य स्थळांकडे आकर्षित होणाऱ्या पर्यटकांच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. याशिवाय, चहा-कॉफी, गरम खाद्यपदार्थ, हिवाळी खाद्यसंस्कृती आणि स्थानिक बाजारपेठांतील उलाढालीवरही त्याचे अप्रत्यक्ष परिणाम जाणवतात. शेती, पाणीपुरवठा आणि आरोग्याच्या दृष्टीनेही ऋतुचक्रातील बदल महत्त्वाचे ठरतात. हवामानातील बदल ही केवळ निसर्गाची बाब नसून ती अर्थव्यवस्था आणि जनजीवनाशी जोडलेली समस्या आहे. दिवाळीचा प्रकाश वाढत असताना थंडी मात्र दूरच राहिली, तर अनेक व्यवसायांच्या आशांवर पाणी फिरू शकते. त्यामुळे बदलत्या हवामानाचे गांभीर्य ओळखून त्यानुसार नियोजन करणे, ही काळाची गरज आहे. ■

९८८१७१६०२७

कानोसा

डॉ. अमोल पुसदकर

आम्ही जागे आहोत

कोजागरी पौर्णिमा म्हटले की डोळ्यांसमोर येते ते चांदण्यांनी उजळलेले आकाश, चंद्रप्रकाशात न्हाऊन निघालेली सृष्टी, मसाला दुधाचा आस्वाद आणि एकत्र आलेल्या माणसांमधील आनंदाचे क्षण. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सण आणि उत्सवाला केवळ धार्मिक महत्त्व नसते, तर त्यामागे जीवनाला दिशा देणारा विचारही असतो. कोजागरी पौर्णिमेच्या संदर्भात सांगितली जाणारी 'को जागर्ति?' म्हणजेच 'कोण जागे आहे?' ही संकल्पना आजच्या सामाजिक परिस्थितीत नव्याने समजून घेण्याची आवश्यकता आहे. आज प्रश्न केवळ रात्री जागे राहण्याचा नाही, तर समाज म्हणून आपण आपल्या कर्तव्यांप्रति, समस्यांप्रति आणि भविष्याप्रति किती जागे आहोत, हा आहे.

आज आपण तंत्रज्ञानाच्या दृष्टीने प्रगत झालो आहोत. मोबाईल, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजमाध्यमांमुळे जग जवळ आले आहे. माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे; मात्र या माहितीच्या गर्दीत विवेक हरवत चालला आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. प्रत्येक गोष्ट त्वरित समजते, पण तिचा अर्थ समजून घेण्यासाठी आपण थांबतो का? प्रत्येक घटनेवर प्रतिक्रिया दिली जाते, पण तिची सत्यता तपासली जाते का? विद्यार्थ्यांवर पोलिस अत्याचार करीत आहेत अशा रील्स समाज माध्यमांवर फिरतात परंतु त्या पूर्ण सत्य असतात का, हे सुद्धा जाणून घेणे आवश्यक आहे. जागृत समाजाचे पहिले लक्षण म्हणजे केवळ माहिती असणे नव्हे, तर माहितीचे विश्लेषण करण्याची क्षमता असणे. एखादी गोष्ट माझ्या विरोधात असू शकेल परंतु ती समाजाच्या विरोधात तर नाही ना, हे तपासणे जागृतीचेच लक्षण आहे.

समाजमाध्यमांवरील अपूर्ण माहिती, अफवा, द्वेषपूर्ण जातीय संदेश आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या सामाजिक वातावरण दूषित करतात. अनेकदा सत्य समजून घेण्यापेक्षा आपल्या मताला समर्थन देणारी माहिती स्वीकारली जाते. असे म्हटले आहे की, आपण नेहमी तेच ऐकतो, वाचतो, बोलतो, जे आपल्या मताशी सुसंगत असते; परंतु आमच्या विचारांच्या विरोधात असलेल्या व्यक्तीशीसुद्धा आम्ही किती चांगल्या प्रकारे वागू शकतो, याचाही विचार करणे गरजेचे आहे. परमत सहिष्णुता हा सुद्धा आमच्या संस्कृतीचा गुणधर्म आहे. काही विचारांना, नेत्यांना आम्ही इतके मानू लागतो की, त्यांचा प्रत्येक शब्द झेलण्यासाठी आम्ही तयार असतो. त्यासाठी आमच्या परंपरागत मित्रांशी सुद्धा शत्रुत्व घ्यायला आम्ही मागे पुढे पाहत नाही. हे खरे अंधानुकरण आहे. नेत्यांनी बोललेल्या आमच्या धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीय मानबिंदू यांच्या विरोधातील विचारांना सुद्धा आम्ही कसे काय सहन करू शकतो, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे मनामध्ये हा प्रकाश जागविण्याची आवश्यकता आहे. हा प्रकाश सतत विवेक बुद्धीचा प्रकाश आहे. कोणताही विचार, पक्ष, संघटना ही व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या हितापेक्षा मोठी असू नये.

आज आपल्या सभोवताल अनेक प्रश्न आहेत. महिलांची सुरक्षितता, व्यसनाधीनता, कुटुंबव्यवस्थेतील ताणतणाव, ज्येष्ठ नागरिकांचे एकाकीपण, तरुणांमधील मानसिक अस्वस्थता आणि सामाजिक संबंधांमधील वाढते अंतर या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दुसऱ्याच्या दुःखाकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहण्याऐवजी त्याच्या मदतीसाठी पुढे येणे, हीच खरी सामाजिक जागृती आहे. आमच्या सभोवताल गर्दी खूप आहे, पण खरे दर्दी कुठे आहेत? "बाहर तो उजाला है मगर दिल में अंधेरा" अशा पद्धतीची परिस्थिती आहे. लाखो लोकांनी घेरलेल्या व्यक्तीला एकटेपणाची जाणीव आहे, हाच खरं तर समाज म्हणून आपला पराभव आहे. यासाठी आमच्या संस्कृतीने परदुःख सहिष्णुता हा गुणधर्म सांगितलेला आहे. कोजागरीच्या निमित्ताने मनामनातील हा अंधकार मिटावा, यासाठी परस्पर संबंधांमध्ये गोडावा निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

आजच्या उपभोगवादी जीवनशैलीमध्ये प्रतिष्ठेचे मोजमाप अनेकदा महागड्या वस्तू, गाड्या, कपडे आणि दिखाऊ खर्चावर केले जाते. वाढते उत्पन्न असूनही अनेक कुटुंबांमध्ये आर्थिक असुरक्षितता जाणवते. अनावश्यक कर्ज, ऑनलाईन आर्थिक फसवणूक, झटपट श्रीमंत होण्याच्या योजना आणि आर्थिक नियोजनाचा अभाव यामुळे सामान्य माणूस अडचणीत सापडतो. म्हणूनच आर्थिक साक्षरता ही आजच्या काळातील महत्त्वाची सामाजिक गरज आहे. आजच्या काळात सगळ्यांनी हे लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे की, सुवर्णमृग म्हणजे सोन्याचे हरिण राहत नाही आणि राहिले, तर ते मायावी असते. त्यामुळे फसवणूक होऊ शकते. समाजाला या आर्थिक विवेकाच्या प्रकाशाची सुद्धा आवश्यकता आहे.

कोजागरी पौर्णिमेचा चंद्र आपल्याला प्रकाशाचे महत्त्व सांगतो. परंतु समाजातील अंधार दूर करण्यासाठी आकाशातील चंद्र पुरेसा नाही; प्रत्येकाच्या मनात विचारांचा, संवेदनशीलतेचा आणि कर्तव्यनिष्ठेचा प्रकाश निर्माण झाला पाहिजे. 'को जागर्ति? कोण जागा आहे?' या प्रश्नाचे उत्तर केवळ 'मी जागा आहे' असे देऊन चालणार नाही. यावेळच्या विजयादशमीच्या भाषणामध्ये पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, या देशातील सामान्यातल्या सामान्य माणसाला सुद्धा त्याच्या राष्ट्रीय कर्तव्याचे निर्वहन करण्याची संधी मिळाली पाहिजे. कोण जागा आहे, या प्रश्नाचे उत्तर "आम्ही जागे आहोत" असेच आले पाहिजे. असे जर झाले, तर त्या दिवशी कोजागरीचा प्रकाश केवळ पौर्णिमेच्या रात्रीपुरता मर्यादित राहणार नाही; तो आपल्या संपूर्ण समाजजीवनाला दिशा देईल. कोजागरीच्या निमित्ताने एवढे चिंतन पुरेसे आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

वाचक पत्रे

संविधान, संवैधानिक संस्था आणि लोकशाहीला झुंडशाहीचे आव्हान

शनिवार दि. १० आक्टोबरच्या तरुण भारतामध्ये प्रकाशित डॉ. विलास चिंतामण देशपांडे यांच्या ''संसदीय लोकशाहीची सांस्कृतिक अवहेलना' या लेखात त्यांनी पुढाऱ्यांच्या नैतिक आणि व्यावहारिक विकृतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. देश निधिपती आहे आणि पुढारी त्याचे प्रतिनिधी. पण पुढारी स्वतः निधिपती किंवा अधिपती असल्याच्या तोऱ्यात वावरताना दिसतात. लोकशाहीत जनता सार्वभौम आहे. जनतेने पुढाऱ्यांना तिचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिला आहे. पुढारी केवळ प्रतिनिधी आहेत. जनतेने स्वतःच्या कल्याणासाठी आणि राष्ट्राच्या गौरवासाठी लोकशाही व्यवस्था स्वीकारली आहे. प्रतिनिधींनी साधकबाधक चर्चा करून जनतेसाठी कल्याणकारी निर्णय घ्यायचे असतात. त्यासाठी संसद आहे. देशाचे संविधान मार्गदर्शक आहे. लोकशाहीत सहमतीचा आग्रह असला तरी मतभिन्नतेलाही महत्त्व आहे. एखाद्या प्रस्तावाला विरोध करण्यास वाव आहे पण त्यात दुराग्रह आणि आक्रस्ताळेपणाला स्थान नाही. आपल्या संसदीय इतिहासात पूर्वसूरींनी अतिशय प्रगल्भ असे संकेत रुजवले आहेत. मात्र आताशा संसदेत झुंडशाहीचे प्रदर्शन होताना दिसते आहे. सततच्या पराभवामुळे हताश झालेले विरोधी पक्षाचे प्रतिनिधी सत्तापक्षाचा विरोध करताना कळपाने, सर्व संसदीय संकेत धाब्यावर बसवून, गोंधळ घालतात. त्यांना चर्चेपेक्षा गोंधळ घालण्यात, संसदेचे कामकाज ठप्प करण्यात अधिक रस वाटतो. ही झुंडशाही आहे. संसद बंद पाडणे ही केवळ चूक नाही तर अपराध आहे, जनतेची फसवणूक आहे, शक्ती व वेळेचा अपव्यय आहे व लोकशाहीची अवहेलना आहे. या झुंडशाहीचे नेतृत्व करतात राहुल गांधी. ते काँग्रेसचे शीर्षस्थ नेते असले तरी अतिशय अपरिपक्व, बालिश व उथळ आहेत. आता विरोधी पक्षांना संसदेबाहेर नवजात कॉक्रोच जनता पक्षाच्या नवीन रक्ताची साथ मिळाली आहे. आज काँग्रेस पक्षाची स्थिती एखाद्या प्रादेशिक पक्षापेक्षाही दुर्बळ आहे. काँग्रेससकट सर्व विरोधी पक्षांना मोदी असह्य झाले आहेत. मोदींची समाजाच्या तळागाळापर्यंत असलेली लोकप्रियता, मोदींना मिळत असलेली आंतरराष्ट्रीय मान्यता व प्रतिष्ठा, मोदींची विकासाची दृष्टी, त्यांच्या नेतृत्वात भारताने साध्य केलेली आर्थिक आणि सामारिक प्रगती इत्यादी गोष्टींमुळे मोदींना खाली खेचणे अवघड आहे, हे विरोधक जाणून आहेत. त्यामुळे देशात अराजकता आणि अस्थिरता निर्माण करायची आणि मोदींना बदनाम करायचे, असे धोरण विरोधकांनी अंगीकारले आहे. भारताचे सामर्थ्य वाढू नये असे अमेरिका आणि इतर काही देशांना वाटते. भारतात अशांती निर्माण करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. अशा भारतविरोधी शक्तींनी मोदीं विरोधकांच्यामागे त्यांचे पाठबळ उभे केले असू शकते, हे असंभव नाही. झुंडशाही मातब्बर ठरून राजशटक उलथविण्यात यशस्वी झाली तर ती सोकावण्याचा संभव असतो. भारताची जनता केवळ मतपेटीतून सरकार उभे करणे पसंत करते. संधी मिळताच ज्याची त्याला योग्य जागा दाखविण्याचे कौशल्य भारतीय जनतेत आहे. याला इतिहास साक्षी आहे.

वसंत दीक्षित/९१३७८६६६१७

ग्रामीण भागात आता सीतादहीची लगबग

सृष्टीची निर्मिती जारज, श्वेतज, जलज, अंडज, बीजज या सर्व पद्धतीने झाली. बीजजपासून निर्मित कापसाच्या बोंडाने समग्र सृष्टीतील जारज निर्मित मानवाचे अंग झाकून लज्जा रक्षण केले. कापसापासून वस्त्र तयार करण्यात आले. बळीराजाकरिता जणू पांढरे सोनेच सृष्टीने तयार केले. सध्या शेतशिवारांमध्ये हाच कापूस निघाला असून तो वेचण्याची तयारी सुरू झाली आहे. कापूस बोंडातून काढण्यालाच वेचणी म्हणतात आणि ही वेचणी सुरू करण्यापूर्वी जो काही विधी केला जातो, त्यालाच सीतादही असे ग्रामीण भागात संबोधले जाते. हरितक्रांतीपूर्वी पारंपरिक बियाणे व नवनवीन आधुनिक तंत्रज्ञान नसल्याने कापूस शक्यतोवर दिवाळीनंतरच निघायचा. हल्ली तंत्रज्ञानाने संशोधित कापूस वाणाचे बियाणे अल्पावधीतच कापूस देते. तसेच सिंचनाची सोय झाल्याने पावसाळापूर्वीच लागवड होत असल्याने विजयादशमीपूर्वीच कापूस वेचणीस सुरुवात होते. बळीराजा व महिला मजूर सीतादही पूजन केल्याशिवाय कापूस वेचत नाही. सीतापदीकरिता घरधनीन वेचणीच्या पहिल्या दिवशी गाईच्या दुधाचे विरजण लावून दही तयार करते. सकाळीच मऊ भात शिजवून पूजेची सामग्री फुले, हळदकुंकू तयार ठेवून सुवासिनी मजुरांकरवी पूजेची आरास केली जाते. ७ दगड धुऊन कपाशीच्या झाडाजवळ मांडून कापूस फुलाच्या गोप्याची प्रतिमा तयार केली जाते. नंतर नवीन कापसास पीळ देऊन त्याचा पाळणा केल्यावर त्यात गोपा निजवला जातो. पूजा संपताच नारळ फोडून साखरमिश्रित दहीभाताचे बोने शेतात फेकत 'धन्याले धन दे... आमाले अन्न दे...' अशी विनवणी काळ्या आईस केली जाते. सध्याच्या आभासी युगातही शेतकरी सीतादही पूजनाची परंपरा कायम राखून आहे. ■

नितीन दुर्बुडे/९५०३६४८६३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

चारा लागवडीसाठी १ लाख २१ हजार रुपये

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ ऑक्टोबर : 'व्हीबी-जी राम जी' (विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन) योजनेच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी विविध माध्यमांतून एका एकरासाठी जवळपास १ लाख २१ हजार रुपयांचे भरघोस आर्थिक सहाय्य मिळणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या लातूर जिल्हा प्रशासनाच्या या पथदर्शी उपक्रमावर राज्य शासनाने मोहोर उमटवली असून, आता हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येणार आहे. रब्बी हंगामासाठी पाण्याची सुविधा असलेल्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. जिल्हा वार्षिक योजनेतून 'महाबीज'चे उच्च दर्जाचे 'स्पीडफीड' बियाणे शेतकऱ्यांना पूर्णपणे मोफत पुरवले जात आहे. वैयक्तिक जमिनीवर १ एकर क्षेत्रासाठी तब्बल १ लाख २१ हजार ८१५ रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. यामध्ये ८४ हजार ९५६ रुपये मजुरी, तर बियाणे, खते आणि इतर आवश्यक साहित्यासाठी ३६ हजार ८५९ रुपयांचा निधी थेट उपलब्ध होणार आहे. लागवडपूर्व कामांमध्ये जमिनीची साफसफाई, पूर्व मशागत आणि माहिती फलकासाठी एकूण १० हजार ९२५ रुपये खर्च अपेक्षित असून, प्रथम वर्षातील रोपे, पेरणी, खत व्यवस्थापन, पाणी देणे, डवरणी, निंदणी, विविध टप्प्यांवरील कापणी व इतर कामांसाठी सुमारे १ लाख १० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विविध वृत्त.....

आज 'राष्ट्रीय जंतनाशक दिन' मोहीम

४ लाख ७७ हजारांहून अधिक बालकांना मिळणार जंतनाशक औषध

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ ऑक्टोबर : निरोगी बालक, सुदृढ भविष्य हे ब्रीदवाक्य घेऊन लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत लातूर जिल्ह्यात येत्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजी 'राष्ट्रीय जंतनाशक मोहीम' राबविण्यात येणार असून या अंतर्गत १ ते १९ वर्ष वयोगटातील एकूण ४,७७,५३१ बालकांना जंतनाशक औषधे दिली जाणार आहेत.

अस्वच्छता, दूषित मातीचा संपर्क आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे बालकांच्या आतड्यांमध्ये जंतांचा संसर्ग होतो, ज्यामुळे मुलांमध्ये रक्तक्षय, कुपोषण, अशक्तपणा, भूक न लागणे व पोटदुखी यांसारख्या समस्या उद्भवून त्यांच्या शारीरिक वाढीवर, मानसिक विकासावर आणि शालेय उपस्थितीवरही प्रतिकूल परिणाम होतो. ही बाब विचारात घेऊन जिल्हभरात २,४५७ अंगणवाड्या, २,१३२ शासकीय शाळा आणि १,६५६ खाजगी शाळा व महाविद्यालये अशा एकूण ६,५९३ केंद्रांवरून सर्व पात्र बालकांना 'आल्बेन्डाझोल' हे जंतनाशक औषध वयानुसार अधिकृत मार्गदर्शक सूचनांनुसार दिले जाणार आहे.

एखाद्या कारणास्तव २७ ऑक्टोबर रोजी जे बालक औषध घेण्यापासून वंचित राहतील, त्यांच्यासाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी 'मॉप-अप राउंड'चे आयोजन करण्यात आले असून त्या दिवशी त्यांना हे औषध दिले जाईल. काही बालकांमध्ये संसर्गाची लक्षणे दिसत नसली तरीही धोक्याची शक्यता असल्याने पात्र बालकांना हे औषध देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांच्या पोषणस्थितीत सुधारणा होऊन निरोगी विकासास मदत होईल. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग एकत्रितपणे सहभागी होत असून आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व शिक्षक यांच्यात योग्य समन्वय साधण्यात येत आहे.

शेतकऱ्यांकडून अनुदान,पीक विम्याची आकडेमोड सुरू ....?

सुधीर गंगणे

तभा वृत्तसेवा

औसा दि.२६ ऑक्टोंबर : निसर्गाच्या अवकृपेमुळे यंदाच्या खरीप हंगामात होत्याचे नव्हते झाले असून.निसर्गाच्या लहरीपणात रब्बी हंगामाच्या आशा पुर्णपणे मावळल्या आहेत. शेतकऱ्यांना पुढील याच दिवसापर्यंत अख्खे साल घालवायचे असल्याने शेतीतून जगण्यासाठी कसलाही आशेचा किरण आज तरी दिसूत येत नाही.आजचा दिवस गेला. उद्या जगायचे कसे.....?असा प्रश्न्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. मात्र उत्तर मिळत नाही.त्यामुळे येर्णाया सालातील काही दिवसांचे आर्थिक ओझे कमी करण्यासाठी या वर्षी किती हेक्टरचे अनुदान मिळेल..? पीक विमा हेक्टरी किती हजार रूपये मिळेल......? याची आकडेमोड शेतकऱ्यांकडून होत आहे.

गेल्या वर्षी चांगला पाऊस पडला. पण पाऊस सरासरीपेक्षा अधिक पडल्याने आणि काढणी दरम्यान पाऊस पडल्याने खरिप हंगामातील पिकांचे नुकसान झाले होते. त्यानंतर एकदम गायब झाला. पेरणी योग्य मशागती करून शेतकऱ्यांनी रब्बी हंगामासाठी जमिनी तयार केल्या. यामध्ये ओल कमी झाली. यानंतर पाऊस पडला नाही.परिणामी रब्बी हंगामात शेतकऱ्यांना वर्षांत दुसऱ्यांदा उत्पादनातील नुकसानीचा सामना करावा लागला होता.राज्य सरकारने खरिप हंगामातील नुकसानीची, पुरामुळे झालेल्या नुकसानीची,खरडून गेलेल्या जमिनीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली.नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी खरिप हंगामातील पिकांना हेक्टरी १७ हजार पाचशे रूपयांचा पीक विमा,अनुदान जाहीर केले.

गेल्या वर्षी हेक्टरी ८ हजार ५०० रूपये तीन हेक्टर पर्यंत आणि हेक्टरी १० हजार रूपये तीन.हेक्टर पर्यंत रब्बी हंगामातील पेरणीसाठी शेतकऱ्यांना राज्य सरकारने दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक विमा मिळेल याची खात्री पटली होती. या काळात अनेकांनी पीक विमा मिळणार नाही.असे पोटतिडकीने सांगण्याचा प्रयत्न केला. पण ते कोणालाही पटले नाही. पुढच्या आठवड्यात येणार.पंधरा दिवसांत येणार.पुढच्या महिन्यात मिळणार. अशा आशावादी अफवावर विश्र्वास ठेवत नव्या वर्षातील नव्या खरिप हंगामातील पेरणीचा मोसम जवळ आला. आणि ओसा तालुक्यातील भादा,आलमला येथील शेतकऱ्यांना पीक वीमा मिळाला. त्यावेळी आपण वगळणीत आहोत याची खात्री शेतकऱ्यांना पटली. तेव्हा वेळ फारच पुढे गेली होती.खाजगी व बँकांची देणं थकीत असल्याने शेतकऱ्यांची बाजारातील पत संपली होती. या काळातील पीक विम्याच्या अफवा मात्र जोरदार सुरू होत्या. या अफवांच्या लाटेत शेतकऱ्यांनी उडी मारून थेट कृषी दुकानदारांनाच पीक विम्याच्या वायद्यावर खरिप हंगामातील बी बियाणे, रासायनिक खतांची खरेदी केली.जुन महिन्यात पडलेल्या पावसावर व पुढील पावसाच्या आशेवर खरिप हंगामातील पेरणी केली.

जुन, जुलै महिन्यात पिके हिरवी राहतील एवढी काळजी घेत पाऊस पडला.ऑगस्ट महिन्यात सुरुवात चांगली झाली. यानंतर उघाडीप दिली. ती आजपर्यंत आहे.कढणीपुर्वी ४०- ४५ दिवसांच्या पडलेल्या उघाडीपीने कांहीं भागातील पीके करपली,कांहीं भागातील पीके हिरवी पण शेंगा भरल्या नाहीत. तर कांहीं भागांतील उभ्या पिकांना शेंगाच लागल्या नाहीत. अशा दयनीय ,हताश झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या पाहणी, पंचनामे झाले.राज्य सरकारने नुकसानीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शेतर्क़यांच्या पाठिशी सरकार खंबीरपणे उभा असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. दुष्काळ जाहीर करून भरीव मदत देण्याचे आश्र्वासन दिले.व जाहीर करून शासनाने आश्र्वासनांची पूर्तता केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अंतिम अपेक्षा आता सरकारवरच टिकून आहेत.यंदा अनुदान हेक्टरी किती रूपये आणि किती हेक्टरापर्यंत मिळणार....? पीक विमा कोणत्या पिकांसाठी किती मिळणार...? उडीद, मुग या पिकासाठी किती मिळणार.तूर पिकांसाठी किती मिळणार..? आणि सर्वात भरवशाच्या सोयाबीन पिकासाठी हेक्टरी किती रूपये पीक विमा मिळणार. प्रशासनाने किती टक्के नुकसान राज्य सरकारला पाठवले आहे.पीक विमा कंपनीच्या कापणी प्रयोगात किती टक्के नुकसान दिसून आले आहे.अशा एक नाही तर अनेक विषयावर औसा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये चर्चा होत आहे.तसेच यंदाच्या दुष्काळात हेक्टरी किती रूपये अनुदान येईल. किती हेक्टरापर्यंत मिळेल.पीक विमा हेक्टरी किती रूपये मिळेल.उडीद,मुग,तूर सोयाबीन यापैकी कोणत्या पिकाला अधिकचा पीक वीमा मिळेल. याची आकडेमोड आज तरी तालुक्यातील प्रत्येक गावागावातील शेतकरी करीत असून यातून किती दिवसांची गरज भागणार......? पुढे काय......?असा सवाल उपस्थित होत आहे.मात्र डोक्यावरील कर्जाचे ओझे कसे कमी होईल. हा प्रश्न्न आज तरी चर्चतूनही अनुत्तरणीय असल्याचे दिसून येत आहे.

सौ. सरोज वेल्हाळ यांचे निधन

तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि. २६ ऑक्टोबर : निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील आडत व्यापारी प्रमोद वेल्हाळ यांच्या पत्नी सौ. सरोज वेल्हाळ वय ५० वर्षे यांचे दीर्घ आजाराने शनिवार दि. २४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत रविवार दि. २५ रोजी दुपारी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई व नातवंडे असा परिवारा आहे . येथील व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळूमामा वेल्हाळ यांच्या त्या भाऊजय होत.

केमिस्टस् ॲन्ड ड्रगिस्टस् असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी रामदास भोसले यांची निवड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ ऑक्टोबर : महाराष्ट्र स्टेट केमिस्टस् न्ड ड्रगिस्टस् असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी लातूर जिल्हा केमिस्टस अँड ड्रगिस्ट असो. चे अध्यक्ष रामदास भोसले यांची निवड झाली आहे.

द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस् ॲन्ड ड्रगिस्टस् असोसिएशनच्या २०२६-२०२९ या कालावधीसाठी शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी शिर्डी येथे झालेल्या अत्यंत चुरशीच्या सार्वत्रिक निवडणुकीत 'आप्पासाहेब शिंदे पॅनल'ने प्रचंड बहुमताने दणदणीत विजय संपादन केला आहे. महाराष्ट्र राज्यात केमिस्ट संघटनेचे तब्बल १ लाखांहून अधिक सदस्य आहेत. या विशाल संघटनेच्या अध्यक्षपदी, माजी आमदार, आप्पासाहेब उर्फ जगन्नाथ शिंदे यांची मोठ्या बहुमताने सलग दहाव्यांदा निवड झाली असून, त्यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण पॅनलने घवघवीत यश मिळवले आहे.

या निवडणुकीत नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी लातूर येथील रामदास भोसले , मोठ्या मताधिकाने निवडून आले आहेत. या संघटनेवर अप्पासाहेब शिंदे यांचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध झाले आहे. संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष म्हणून रामदास भोसले यांनी मागच्या अनेक वर्षात अत्यंत उल्लेखनीय कार्य केले आहे.

शालेय पोषण आहाराचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा..

पंचायत समिती सभापतीच्या अनेक शाळा भेटीतील प्रकार उघड

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २६ ऑक्टोबर : तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विध्यार्थ्यांसाठी देण्यात येणारा सकस आहाराचा पुरवठा अतिशय निकृष्ट दर्जाचा होत असून यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार आहे. पुरवठा होणारा आहार निकृष्ट दर्जाचा असला तरी चौकशीच्या भीतीपोटी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून उत्कृष्ट आहार पुरवठा झाला म्हणून पोहोंच पावतीवर स्वाक्षरी घेतली जाते. वरिष्ठ पातळीपर्यंत प्रशासकीय यंत्रणेत साखळी असल्यामुळे निकृष्ट आहार मिळूनही सहनही होईना अन् सांगता येईना अशी गत त्यांची झाली आहे. या निकृष्ट प्रकाराबाबत पंचायत समितीच्या सभापती सुनिता वाघमारे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

निलंगा तालुक्याचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे जिल्हा परिषद शाळाची संख्या अधिक आहे. सकस आहार योजनेसाठी तालुक्यातील २८३ शाळा पात्र असून पहिली ते आठवी पर्यंतच्या विध्यार्थ्यांना सकस आहार योजनेतून खिचडी दिली जाते मात्र यासाठी असलेले पूरक धान्य अतिशय निकृष्ट दर्जाचे असून त्यातील हरभरा, मटकी, मुगडाळ, मसूरडाळ, कांदा, लसूण आदी साहित्य सुमार दर्जाचे असून त्यामधून उग्र वास येत आहे. तर तांदूळ पुरवठाही अतिशय निकृष्ट दर्जाचा येत असल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी अन्नात किडे किंवा अळ्या आढळल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. शिवाय आहारासाठी सरकारकडून मिळणारे अनुदान आणि भाजीपाला, इंधनासाठीचा खर्च अत्यंत अपुरा पडतो. वाढत्या महागाईमुळे या अल्प निधीत दर्जेदार आहार देणे शाळा व्यवस्थापनासमोर मोठे आव्हान ठरते. प्रशासकीय व तांत्रिक अडचणींमुळे पोषण आहाराचा निधी वेळेवर मिळत नाही. परिणामी, बऱ्याचदा शिक्षक किंवा मुख्याध्यापकांना स्वतःच्या खिशातून पैसे घालून मुलांच्या जेवणाची व्यवस्था करावी लागते.

अनेक ठिकाणी जेवण बनवणाऱ्या स्वयंपाकघरांमध्ये स्वच्छतेच्या नियमांकडे दुर्लक्ष होते. अन्न व औषध प्रशासनाचे (ऋऊ) नियम पाळले जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ होत आहे. शाळा व्यवस्थापन समित्या आणि पालकांनी आहारात मिळणाऱ्या जेवणाच्या दर्जावर सतत लक्ष ठेवणे व बिघाड झाल्यास तातडीने शिक्षण विभागाकडे तक्रार करणे आवश्यक आहे. तालुक्यातील १५ केंद्रामधील केंद्र प्रमुखांकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही.

निलंगा पंचायत समितीच्या सभापती सुनीता वाघमारे यांनी शहरातील अशोक नगर, तालुक्यातील हंचनाळ, हासोरी येथील जिल्हा परिषद शाळाना भेटी दिल्या असून या निकृष्ट आहाराचा पंचनामा केला आहे. संबंधित ठेकेदाराकडून शाळेसाठी आहार पुरवठा निकृष्ट होत असून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी त्यानी वरिष्ठाकडे केली आहे.

महाराष्ट्रातील दृष्टी दिव्यांग मुला-मुलींचा आवाज निनादला जयपुरात!

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ ऑक्टोबर : अनुराग संगीत संस्थान, जयपूर यांच्यावतीने मागील ३४ वर्षांपासून संगीत क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील प्रतिभावान दृष्टी दिव्यांग मुला-मुलींसाठी राष्ट्रीय सुगम गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधून शेकडो दृष्टी दिव्यांग मुले-मुली सहभागी होत असतात. यावर्षी अनुराग संगीत संस्थानच्यावतीने जयपूर येथे ३४वी दृष्टीबाधितांसाठी अखिल भारतीय सुगम गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या राष्ट्रीय स्पर्धेत बियाँड व्हिजन फाउंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन यांच्या सौजन्याने नागपूर, यवतमाळ, नांदेड, लातूरसह हिंगोली जिल्ह्यातील सुगम गायन क्षेत्रात कौशल्य प्राप्त दृष्टी दिव्यांग मुला-मुलींनी सहभाग नोंदविला.

अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या दहा स्पर्धकांमध्ये महाराष्ट्रातील तीन स्पर्धकांचा समावेश होता. युवा गटात यवतमाळ येथील पूजा शेंद्रे हिने दिल चीज क्या है, आप मेरी जान लीजिए! ही गझल सादर केली . प्रथम पुरस्कारासह ५० हजार रुपयांची पारितोषिक रक्कम व प्रमाणपत्र पटकावले.

बाल गटात ग्रामीण भागातून आलेल्या कृष्णा देवकते यांनी दर्जेदार सादरीकरण करत दिल धड़कने का सबब याद आया! ही गझल सादर केली. तृतीय पुरस्कारासह १५ हजार रुपयांची पारितोषिक रक्कम मिळाली.

युवा गटात हदगाव येथील प्रदीप नरवाडे यांनी उसके हंसते हुए चेहरे से ऐसा लगता है! ही गझल सादर करून उत्तेजनार्थ पुरस्कार पटकावला.

याच कार्यक्रमात लातूर येथील बियाँड व्हिजन फाउंडेशन या संस्थेला राष्ट्रीयस्तरावर दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अनुराग संगीत संस्थानच्यावतीने प्रतिष्ठेचा 'स्व.राजकुमार काला स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

पुरस्काराचे वितरण प्रख्यात हिंदी दैनिक राजस्थान पत्रिका समूहाचे मुख्य संपादक गुलाबजी कोठारी, सुधांशू कासलीवाल, अनुराग संगीत संस्थानचे अध्यक्ष ज्ञानचंद झांजरी आणि महामंत्री डॉ. अजितकुमार जैन यांच्या हस्ते करण्यात आले.

विजेत्या स्पर्धकांचे समाजसेविका डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, डॉ.विजय राठी, प्रा.डॉ.गुणवंत बिरादार, प्रा.डॉ.संजय गवई, प्रा.डॉ.घनश्र्याम ताडेवार, ड.धनंजय चित्ताडे, सुनील ओझा, श्रीकृष्ण शिंदे, अमोल निलंगेकर, मेघा अग्रोया, ज्योती किरण मंत्री, रोटरी क्लब ऑफ नांदेडचे सचिव प्रशांत गुजर, प्रशांत राठोड, पोलीस निरीक्षक संजय बोरकर, संजय शिंदे, राजीव मोतेवार, तेजोमय प्रतिष्ठानचे ज्ञानेश्र्वर आहेरकर, गणेश दाचावार, फाउंडेशनचे सचिव संदीप चोपडे, मीरा चोपडे, बालाजी गुट्टे, रोहन बालाजी कदम यांनी अभिनंदन केले आहे.

भाशिप्र संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षांनिमित्त शास्री विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २६ ऑक्टोबर : भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षांनिमित्त लालबहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलात पालक मेळावा हजारो पालकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून सतनप्पा हुरदळे प्रमुख व्याख्याते उद्धव फड स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे चंद्रकांत धनबा व्यंकटराव गुरमे अंजलीताई नळगीरकर वर्षा जावरे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे अंकुश मिरगुडे उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे यांची उपस्थिती होती.

मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी पालकांच्या प्रचंड उपस्थितीमुळे आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजविण्यासाठी पालकांनी कोणती भूमिका बजावली पाहिजे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख वक्ते उद्धव फड यांनी आपल्या मार्गदर्शनातून संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. 'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण' या उक्तीचा संदर्भ देत पालकांनी आपल्या पाल्यांना केवळ संपत्ती कमावण्यापेक्षा संस्कारांची शिदोरी कमवण्यावरण अधिक भर द्यावा असे सांगितले. आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापरापासून दूर ठेवणे त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांना संस्कारक्षम नागरिक बनविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासात कुटुंबातील वातावरण आणि पालकांचे आचरण यांचा मोठा वाटा असतो असेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात सतनप्पा हुरदळे यांनी शिक्षक व पालक यांच्यात सुसंवाद महत्वाचा असून त्यातूनच पाल्याची प्रगती होत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया गोविंदवाड प्रास्ताविक वसंत वाघमारे स्वागत व परिचय अंबिका पारसेवार वैयक्तिक गीत प्रीती शेंडे तर आभार नीता मोरे यांनी मानले. रूपाली गाडेकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले तानाजी खोकले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख लक्ष्मी चव्हाण सहप्रमुख निलेश मांडवकर यांसह शास्री शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

आरक्षण उपवर्गीकरणविरोधी सोनपेठमध्ये महामोर्चा

आनंदराज आंबेडकर यांची सरकारवर कडाडून टिका, सोनपेठ येथे उसळा निळा महासागर, हजारोंच्या सहभागातून विरोध

परभणी (प्रतिनिधी): अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात सोनपेठ येथे आंबेडकरी समुदायाच्या वतीने काढण्यात आलेल्या महामोर्चात महिला व पुरुष यांनी हातात निळे झेंडे,आरक्षण उपवर्गीकरणविरोधी घोषणा आणि आंबेडकरी विचारांचा जयघोषांनी परिसर दणाणून गेला. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या मोर्चात रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर, पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार, लक्ष्मण शिंदे, प्रा.युवराज धसवाडीकर, चर्मकार समाजाचे नेते संजय खामकर, सिद्धार्थ शिनगारे, विजय साळवे, तेजस्विनी पोटभरे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षणाचे उपवर्गीकरण करून जातींची विभागणी करण्याच्या प्रक्रियेमुळे समाजातील विविध घटकांमध्ये मतभेद निर्माण होण्याची शक्यता असल्याची भूमिका मोर्चेकऱ्यांनी मांडली. आरक्षणाचे उपवर्गीकरण झाल्यास त्याचा वंचित समाजाच्या हक्कांवर विपरीत परिणाम होऊ शकतो, तसेच भविष्यात आरक्षणाच्या अस्तित्वाबाबतही प्रश्न निर्माण होण्याची भीती आंदोलकांकडून व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रभर आरक्षण उपवर्गीकरणविरोधी आंदोलनाची रणनीती आखण्यात आली असून,त्याचाच एक भाग म्हणून सोनपेठ येथे या महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील महिला, पुरुष आणि तरुणांचा सहभाग हे या मोर्चाचे विशेष आकर्षण ठरले. निळे झेंडे घेऊन सहभागी झालेल्या आंदोलकांनी आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.मोर्चादरम्यान रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी सरकारच्या भूमिकेवर कडाडून टीका केली. आरक्षणाचे उपवर्गीकरण करून अनुसूचित जातींमध्ये विभागणी निर्माण केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मूळ सामाजिक अन्याय आणि वंचिततेच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी समाजातील घटकांमध्ये विभागणी होण्याची परिस्थिती निर्माण केली जात असल्याची भूमिका त्यांनी मांडली. अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि समाजाची एकजूट कायम राहावी, या भूमिकेतून आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध दर्शविण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरक्षणाच्या प्रश्नावर आंबेडकरी समाजाची भूमिका सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर आंदोलन उभारले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

या मोर्चाचे प्रास्ताविक ॲड. सिद्धांत सिरसाठ यांनी केले. त्यांनी आरक्षण उपवर्गीकरणविरोधी महामोर्चाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महाराष्ट्रातील आंदोलन अधिक व्यापक करण्यासाठी आंबेडकरी समाजाने संघटितपणे पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्राच्या विधानभवनाला घेराव घालण्यासाठी सोनपेठमधूनही मोठ्या संख्येने आंबेडकरी कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सोनपेठ शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर मुख्य बाजारपेठेत या मोर्चाचा समारोप करण्यात आला. आरक्षण उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर आपला विरोध ठामपणे नोंदविण्यासाठी ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने या मोर्चाने शहराचे लक्ष वेधून घेतले. आंबेडकरी समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडविणाऱ्या या महामोर्चातून आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने समाजाच्या भावना लक्षात घ्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

टीईटी उत्तीर्ण शिक्षकांचा आमरण उपोषणाचा इशारा

परभणी (प्रतिनिधी): जि.प.अंतर्गत कार्यरत टीईटी उत्तीर्ण शिक्षकांच्या पदोन्नतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. न्यायालयीन आदेश व शासनाच्या नियमानुसार पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी शिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

परभणी जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षक व प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी १ सप्टेंबर २०२५ पूर्वी टीईटी उत्तीर्ण केल्याचे निवेदनात नमूद केले आहे.पात्र शिक्षकांचा शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या पदांवरील पदोन्नतीसाठी नियमानुसार विचार करावा,अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, पुढील कार्यवाहीसाठी शिक्षकांना मूळ कागदपत्रांसह जिल्हा परिषदेत बोलावण्यात आले होते. मात्र, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अनुपस्थित असल्याने शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली. कागदपत्रांसह उपस्थित राहूनही कार्यवाही न झाल्याने वेळेचा अपव्यय झाल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.पदोन्नतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावून पारदर्शक पद्धतीने कार्यवाही करावी, अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल,असा इशारा शिक्षकांनी दिला आहे.

बुध्द-भीम गीत गायन स्पर्धेला प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी): ७० व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त धम्म मैत्री संवाद अभियान व आम्ही भारताचे लोक आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ यांच्या वतीने आयोजित बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठवाड्यातील ३० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

बी. रघुनाथ सभागृहात सेलूचे नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.तथागत भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यासह नवोदित गायकांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा आवश्यक असल्याचे सावंत यांनी सांगितले.

लहान गटात राकेश राजू लोखंडे (यलदरी) याने प्रथम, हर्षदा राहुल सोनवणे (परभणी) हिने द्वितीय, तर अति संजय ताजने (नांदेड) याने तृतीय क्रमांक पटकावला. मोठ्या गटात शेख अजीम शेख करीम प्रथम, सिद्धोधन धबाले द्वितीय, तर प्रेम वाकोडे तृतीय ठरले. विजेत्यांना ट्रॉफी, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी सतीश कांबळे होते. यावेळी डॉ. राजेश रणखांबे, अतुल तात्या सरोदे, शकुंतला ढेरे, सुनीताताई साळवे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून भीमशाहीर दासराव पुंडगे व प्रा. शिवाजी कांबळे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन संजय बगाटे यांनी केले, तर संजीव आढागळे यांनी आभार मानले.

परभणीत आरोग्य शिबीराचे आयोजन

परभणी (प्रतिनिधी): बालाजी आयुर्वेदिक निसर्ग उपचार केंद्राच्या वतीने सुप्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ.गोविंद कामटे यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी शहरात लवकरच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरात गुडघेदुखी, सांधेदुखी, कंबरदुखी, किडनी संबंधित आजार, जुनाट आजार, त्वचाविकार तसेच केस गळणे यांसारख्या विविध आरोग्यविषयक समस्यांबाबत नागरिकांना तपासणी व मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

नागरिकांना आरोग्यविषयक समस्या समजून घेता याव्यात आणि योग्य उपचारांबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे, हा या शिबिरामागील उद्देश आहे. शिबिराची निश्चित तारीख, वेळ, ठिकाण आणि नोंदणीसंदर्भातील माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.परभणी शहरातील नागरिकांनी या उपक्रमाची नोंद घ्यावी, असे आवाहन बालाजी आयुर्वेदिक निसर्ग उपचार केंद्राच्या वतीने करण्यात येत आहे.

आ.संतोष बांगर यांची मंत्रीपदी वर्णी लागावी यासाठी औंढा नागनाथ येथील लल्ला देव यांनी सायकलद्वारे गणपतीपुळे यात्रास सुरू केली असुन ही यात्रा आज परभणीत दाखल झाल्यानंतर शिवसेनेचे नितेश देशमुख व महाराजा मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत करत शुभेच्छा दिल्या.

शासकीय निवासस्थानातुन ८२ हजाराचा ऐवज लंपास

परभणी (प्रतिनिधी): शहरातील शिवाजीनगर परिसरातील बी. अँन्ड सी. शासकीय निवासस्थानात घरफोडी करून चोरट्यांनी ८२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी नवा मोंढा पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजय सुखदेव चौधरी यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे. ते आपल्या सासूच्या डोळ्यावरील शस्त्रक्रियेसाठी छत्रपती संभाजीनगर येथे गेले होते. दरम्यान, गुरुवारी रात्री ते शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे चैनलगेट आणि दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील ३५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ८२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी नवा मोंढा पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक ननवरे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान परभणी शहरासह परिसरात सध्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होतांना दिसत असुन पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

अंजलीताई बडवे यांच्या व्याख्यानास प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी): राष्ट्र सेविका समितीच्या वतीने रविवार, दि.२५ रोजी विजयादशमी उत्सव आणि पथसंचलन उत्साहात पार पडले.

उत्सवाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कार्यवाहिका सौ.मनीषाताई देशमुख होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. स्वातीताई देशमुख, तर प्रमुख वक्त्या म्हणून जालना येथील प्रांत सहकार्यवाहिका सौ. अंजलीताई बडवे उपस्थित होत्या.

डॉ.स्वातीताई देशमुख यांनी राष्ट्र सेविका समितीच्या कार्यपद्धती, शिस्त आणि राष्ट्रभक्तीचे कौतुक केले. तर अंजलीताई बडवे यांनी 'प्रभाव से परिवर्तन तक समितीचे ९० वर्ष'

या विषयावर मार्गदर्शन करत समितीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला. वंदनीय लक्ष्मीबाई केळकर यांचे योगदान तसेच सेविकांच्या माध्यमातून समाजात राष्ट्रभक्ती, संस्कार, समर्पण, सेवा आणि समाजजागृतीद्वारे घडणाऱ्या परिवर्तनाची त्यांनी उदाहरणांसह माहिती दिली. भविष्यातही राष्ट्रहितासाठी समाजजागृतीचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन सौ. विभा वसमतकर यांनी केले, तर प्रस्तावना जिल्हा बौद्धिक प्रमुख डॉ. मंजुषा चौधरी यांनी मांडली. यावेळी देशभक्तिपर वैयक्तिक गीत आणि सामूहिक पद्य सादर करण्यात आले. अध्यक्ष मनीषाताई देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले तसेच पंचमुखी मंदिर प्रतिष्ठानचे ऋण व्यक्त केले. यानंतर पंचमुखी हनुमान मंदिर, गव्हाणे रोड येथून घोष पथक आणि भगव्या ध्वजासह पथसंचलनाला सुरुवात झाली. नारायण चाळ चौक, अष्टभुजा मंदिर, गांधी पार्क, शिवाजी चौक आणि कच्ची गल्ली या मार्गाने संचलन पुन्हा गांधी पार्क येथे पोहोचले. मार्गावर ठिकठिकाणी काढलेल्या रांगोळ्या, नागरिकांनी केलेली पुष्पवृष्टी आणि सेविकांचे स्वागत यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राष्ट्रभक्तिपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

गांधी पार्क येथे सामूहिक वंदे मातरम् झाल्यानंतर ध्वजावतरण करून संचलनाची सांगता झाली. पथसंचलन आणि घोष पथकाला प्रांत शारीरिक प्रमुख सौ. कीर्ती थिगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

वाढदिवसानिमित्त आरोग्य, अन्नदान व रक्तदान शिबीर

परभणी (प्रतिनिधी): जनसेवा फाउंडेशनच्या वतीने विकास लोंढे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आरोग्य तपासणी, अन्नदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत मूकबधिर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ.सौरभ डाहाळे यांच्या हस्ते तपासणीस सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले.

जिजाऊ ब्लड बँकेत आयोजित रक्तदान शिबिरात जिल्हा परिषद सदस्य मुंजाभाऊ कुक्कर यांनी स्वतः रक्तदान करून सहभाग नोंदविला. या उपक्रमातून आरोग्यसेवा, अन्नदान व रक्तदानाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विकास भैया लोंढे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष यश घाटुळ, उपाध्यक्ष अर्जुन वाघमारे, वीरेन भराडे, यश परसोडे, मारोती सोपाने, प्रथम भरड यांच्यासह विकास भैया मित्र परिवारातील सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्री महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार प्रमोद वाकोडकर, महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष नानासाहेब भेंडेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके, प्रवीण कोकांडे, विश्वनाथ कणके, उमेश फुलपगार, पंचशीलकरूणा बगाटे, कांदे, काळे, दत्ता शहाणे उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त अनाथालयास ६१ हजाराची आर्थीक मदत

परभणी (प्रतिनिधी): श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी वयाच्या ६१ व्या वर्षपूर्तीनिमित्त वाढदिवस साधेपणाने साजरा करत बीड जिल्ह्यातील ढेकनमोह येथील'पसायदान सेवा हक्काचं घर' प्रकल्पाला ६१ हजार रुपयांची रोख मदत दिली.

या प्रकल्पात ७५ अनाथ मुले-मुली वास्तव्यास आहेत. यावेळी प्रा.संजय ढवळे, प्रा. आबासाहेब सावंत आणि सामाजिक कार्यकर्ते अरुण कदम यांनी मुलांना चप्पल, स्वादिष्ट भोजन व तीन महिन्यांचा किराणा साहित्य दिले. याप्रसंगी प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. जाधव यांनी अनाथ व वंचित मुलांचे संगोपन, शिक्षण आणि संस्कार घडविण्याचे कार्य करणाऱ्या पसायदान संस्थेचे कौतुक केले. नागरिकांनी वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्याऐवजी अशा सामाजिक संस्थांना मदत करावी, असे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन बप्पासाहेब डावकर यांनी केले, तर आभार गोवर्धन दराडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी मुलांसोबत भोजन केले.

भोगावला पाणी टंचाईच्या झळा, योजना सुरू करा

जिंतुर (प्रतिनिधी): तालुक्यातील भोगाव येथे पाणीटंचाई तीव्र झाली असून, गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी बारागाव योजना व सिद्धेश्वर धरण कॅम्पवरून पाणीपुरवठा तातडीने सुरू करावा,अशी मागणी भाजपचे रवी देशमुख व तालुका उपाध्यक्ष सुभाषराव देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

भोगाव गावात गेल्या काही काळापासून पाणीटंचाईची समस्या कायम आहे. वारंवार सूचना देऊनही नळ पाणीपुरवठा व जलजीवन योजनेच्या संबंधित यंत्रणांकडून ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. सध्याची परिस्थिती पाहता गावकऱ्यांना पुढील १५ ते २० दिवसच जेमतेम पाणी मिळण्याची शक्यता असल्याने चिंता वाढली आहे. गावातील जलजीवन योजनेअंतर्गत तयार असलेल्या पाच ते सहा विहिरींचा पाणीपुरवठा अद्याप सुरू करण्यात आलेला नाही. तसेच पाण्याची उपलब्धता असूनही १० ते १२ हातपंप बंद असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.बोअरवेलवरील मोटारीही बंद करण्यात आल्याने उपलब्ध पाणीस्रोतांचा उपयोग होत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. या सर्व सुविधा तातडीने सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.बारागाव पाणीपुरवठा योजना सिद्धेश्वर धरणापासून भोगावपर्यंत आलेली असून, ती कार्यान्वित झाल्यास गावाची पाणीटंचाई दूर होण्यास मदत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.दरम्यान, जलजीवन योजनेच्या विहिरींचा पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत विचारणा केली असता संबंधित कंत्राटदाराने उद्धटपणे उत्तर दिल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जायकवाडीतून रब्बी व चारा पिकांसाठी तीन आवर्तने सोडा

परभणी (प्रतिनिधी): जिल्ह्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, खरीप हंगामातील जवळपास सर्वच पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर रब्बी ज्वारी आणि चारा पिकांच्या लागवडीसाठी जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून तीन आवर्तने सोडण्याचे नियोजन करावे. तसेच आगामी उन्हाळ्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन आणखी दोन आवर्तनांचे नियोजन करावे, अशी मागणी आ.राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला, तरी खरीप पिकांचे नुकसान आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही जायकवाडी धरणाच्या उर्ध्व भागात चांगला पाऊस झाल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. सध्या धरणात ७८ टक्के जिवंत पाणीसाठा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यावर जिल्ह्यातील मानवत, सोनपेठ, पाथरी आणि परभणी ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अवलंबून आहे. याशिवाय या कालव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील सुमारे ९७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन केल्यास दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मोठा आधार मिळू शकतो, असे विटेकर यांनी म्हटले आहे.

रब्बी हंगामात ज्वारी आणि चारा पिकांसाठी तीन आवर्तने सोडल्यास शेतकऱ्यांना ज्वारीचे पीक घेता येईल आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटू शकेल. ज्वारीसारख्या प्रमुख अन्नधान्य पिकाचे उत्पादन वाढण्याबरोबरच शेतमजूर आणि कामगारांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होईल. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण होतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय एप्रिल आणि मे २०२७ या कालावधीत वाढणाऱ्या तापमानामुळे पाणीटंचाईची परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी आणखी दोन आवर्तनांचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक असल्याचे विटेकर यांनी म्हटले आहे. कालव्याची दुरुस्ती आणि इतर आवश्यक कामे वेळेत पूर्ण केल्यास कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंतच्या शेतकऱ्यांना पाणी मिळू शकेल. त्यामुळे या कामांचे नियोजनही दुष्काळी मंत्रिगटाच्या बैठकीत करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

जायकवाडीच्या पाण्याचे योग्य नियोजन करून परभणी जिल्ह्यात ज्वारी आणि चारा पिकांचे उत्पादन वाढविल्यास दुष्काळग्रस्त बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांनाही चारा पुरविणे शक्य होईल. जवळच्या जिल्ह्यांना चारा उपलब्ध झाल्यास वाहतूक खर्चातही बचत होऊ शकते. चारा पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचा चारा राज्य सरकार हमीभावाने खरेदी करणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी महत्त्वपूर्ण ठरू शकते. त्यामुळे तातडीने कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन रब्बी हंगामासाठी तीन आणि उन्हाळ्यासाठी दोन आवर्तनांचे नियोजन करण्याच्या सूचना संबंधित विभागाला द्याव्यात, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे दरम्यान यावेळी आमदार रत्नाकर गुट्टे हे उपस्थित होते.

मानवतला आजपासून शारदोत्सव व्याख्यानमाला

मानवत (प्रतिनिधी): येथील शिक्षक-पालक संघाद्वारे चालविल्या जाणाऱ्या या वर्षीच्या ५८व्या श्री.शारदोत्सव व्याख्यानमालेस मंगळवारपासून प्रारंभ होणार आहे.

शहराच्या सांस्कृतीक परंपरेचा वारसा जपणाऱ्या या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील मान्यवर वक्ते सहभागी झाले आहेत. याहीवर्षी देवी मंदिराच्या सभागृहात दि.२७ ते २९ ऑक्टोंबरपर्यंत चालणाऱ्या या तीन दिवशीय व्याख्यानमालेत दररोज नामवंत व्याख्याते सहभागी होणार आहेत.दि.२७ रोजी परभणीतील प्रसिध्द डॉ.रामेश्वर नाईक हे 'बदलती पिढी बदलता देश' या विषयावर या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफणार आहेत. तर दि.२८ रोजी अंबाजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनी केंद्राचे प्रमुख प्रसाद चिक्षे हे 'दुष्काळ' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दि.२९ रोजी तीसऱ्या दिवशी शेतकरी संघटनेचे नेते गोविंद जोशी हे 'शेती व शेतकरी' या विषयावर व्याख्यान देणार असून याच दिवशी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.व्याख्यानमालेच्या यशस्वीतेकरीता डॉ. शरयु केकाळे, शोभा कुलकर्णी, विलास मिटकरी, किशोर तुपसागर, ॲड.अनिरुध्द पांडे, डॉ.निरज दगडु, प्रा.रुपेश देशपांडे आदी परिश्रम घेत आहेत.

टेंभूर्णी सर्कलमधील अनेक कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश

विधानसभा मतदारसंघात भाजपचे संघटन मजबूत करण्यावर भर

तभा वृत्तसेवा
वसमत, २६ ऑक्टोबर

वसमत विधानसभा मतदारसंघातील टेंभुर्णी सर्कल परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा कपिश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आतिश दांडेगावकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे परिसरात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी आतिश भैय्या दांडेगावकर यांनी नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आपल्या परिसरात पक्षाचे संघटन मजबूत करण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन शासनाच्या विविध योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करता सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. परिसरातील परिस्थितीनुसार योग्य नियोजन करून जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न करावा. संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून जनसेवेला प्राधान्य द्यावे, असेही दांडेगावकर यांनी सांगितले.

आतिश दांडेगावकर यांच्या मार्गदर्शनानंतर भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये ॲड. निळकंठ सवंडकर, ज्ञानेश्वर सवंडकर, गोविंद सूर्यवंशी, रमेश सवंडकर, प्रसाद सवंडकर, माधव सवंडकर, दिनेश सवंडकर, पांडुरंग सवंडकर, बबू सवंडकर, विकास सवंडकर, गणेश सवंडकर, शंकर सवंडकर, दत्तराव सवंडकर, दत्तराव रुस्तुमराव सवंडकर, ओमा सवंडकर, त्रिंबक सवंडकर, नारायण सवंडकर, भैय्या पाटील, गणेश सोनवणे, शिवशंकर सवंडकर, वसंता सवंडकर आणि विठ्ठल थोरात यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या वेळी ग्रामीण पूर्व मंडळ अध्यक्ष ज्ञानेश्वर मुंजाळ, जिल्हा उपाध्यक्ष विजय कडतन, रवी पाटील नादरे, दौलत हुंबाड, गणेश कमळू, भगवानराव कावळे, संजय काकडे, जयवंतराव सवंडकर, संदीप भालेराव, आबासाहेब सवंडकर, गोविंद एजगे, अमोल मुळे, राजेश भालेराव, तुकाराम साळवे, ग्यानोबा काळे, गजानन पप्पलवाड, गोपाळ महाजन, प्रवीण पोफाळकर, अनुज काकडे, सुदाम भालेराव आणि अक्षय अवधूतवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. किरण कुलकर्णी यांच्याकडून नागनाथ मंदिराच्या संवर्धन कामाची पाहणी

भाविकांच्या निवाऱ्यासह पाण्याच्या निचऱ्याबाबत सूचना

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ ऑक्टोबर

मराठी भाषा विभाग तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) नागनाथ मंदिराला भेट दिली. मंदिरात सुरू असलेल्या संवर्धन व विकासकामांची पाहणी करून भाविकांच्या सुविधांचा विचार करत कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

डॉ. किरण कुलकर्णी सपत्नीक औंढा नागनाथ येथे आले होते. मुख्य पुजारी हरिहर भोपी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ किरण कुलकर्णी दाम्पत्याने मंदिरात पूजा केली. त्यानंतर मंदिर प्रशासनाच्या वतीने डॉ. किरण कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांनी मंदिराची हेमाडपंथी वास्तुरचना, उभारणीची पद्धत आणि ऐतिहासिक वैशिष्ट्यांची माहिती जाणून घेतली. संत नामदेव महाराज मंदिर, नंदी, मुख्य मंदिराचा अंतर्गत भाग आणि हरिहर तीर्थ तलावाचीही पाहणी केली.

सुमारे १९३ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामांचे स्वरूप, अंमलबजावणी आणि पुढील नियोजन बांधकाम विभागाचे अधिकारी व वास्तुविशारदांनी त्यांना सांगितले. भूगर्भातील शिवलिंगाच्या दर्शनासाठी जाण्या-येण्याचा मार्ग, प्रस्तावित सुधारणा आणि नव्याने आढळलेल्या पायऱ्यांबाबतही चर्चा झाली. भाविकांची सुलभ ये-जा आणि गर्दीचे व्यवस्थापन लक्षात घेऊन कामे करण्याच्या सूचना डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिल्या.

शहरातील पाणी मंदिरात येऊ नये, यासाठी नगरपंचायतीशी समन्वय साधून योग्य निचऱ्याचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले. मंदिराच्या अंतर्गत भागातील कामे साधारण महिनाभरात, तर बाहेरील कामे सुमारे सहा महिन्यांत पूर्ण होतील, अशी माहिती मंदिर प्रशासनाने दिली.

यावेळी वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, योगेश कासार पाटील, रामेश्वर निपाणे, ओमकार पांडागळे, राजेंद्र बागडकर आणि देवस्थानचे वैजनाथ पवार, प्रवीण जोशी, रामप्रसाद उदगिरे, कृष्णा पाटील, गजानन उदगीरे आदी उपस्थित होते.

दसरा महोत्सव समितीतर्फे कोजागिरी पोर्णिमा साजरी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ ऑक्टोबर

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीतर्फे रामलीला मैदानावर दि. २५ ऑक्टोबर कोजागिरी निमित्त भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी दसरा महोत्सव समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, सदस्य तथा जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष श्रीधर घुगे, व्यवस्थापक तथा सेवानिवृत्त तहसीलदार मधुकर खंडागळे, दौलतराव बनसोडे, विश्वासराव नाईक, नागेश धनमने, गणेश बांगर, ॲड विजय निळकंठे, पाठक महाराज, आघावं, पवन ठाकूर, लक्ष्मीकांत पाठक, राजेंद्र हलवाई, कैलास श्रीनाथ, प्रदीप धडवाई, विजय गुंडेकर, सुनिल पाठक, निलेश यावेळी सुंदर अशा विविध प्रकारचे भजन सादर करण्यात आले यातील ह भ प. शांताताई लगड, चांदू महाराज लगड, देवराव शेळके, हरीभाऊ घेणेकर, अंबादास मोहीते, शांताबाई लगड, शाम राव पवार, चांदुजी लगड, विठ्ठल कूबडे, कलानंद जाधव, देविदास जाधव, साई पोले, माधव जटाळे, नवनाथ जटाळे, प्रभाकर बैरागी, प्रसाद देवकते, जग्गनाथ गादेकर, शिवाजी लगड, गजानन टेकाळे, देविदास जाधव, प्रभाकर बैरागी, दराडे, शिवाजी लगड, नवनाथ जटाळे अंबादास मोहिते, प्रसाद देवकते, शामराव पवार, मगर महाराज यांनी विविध एका पेक्षा एक सरस भजन सादर केले. यावेळी हिंगोली शहरातील नागरिकांची देखील उपस्थिती होती.

हिंगोली– येथील क्रिडा विभागाच्यावतीने शालेय विभागीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. चुरशीचे कबड्डी सामने होत असून प्रेक्षकांनी पाहण्यासाठी गर्दी दिसत आहे. छाया– विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

हिंगोलीत विभागीय कबड्डी स्पर्धांचे उद्घाटन

हिंगोली– क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडा परिषद व जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय हिंगोली द्वारा आयोजित आय.बी. एज्युकेशन फाउंडेशन दिग्रस कराळे फाटा हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन हिंगोली व यांच्या विद्यमाने विभागीय शालेय कबड्डी स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत शालेय वयोगटात १४/१७/१९ मुले-मुली सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत एकूण ५०० पेक्षा जास्त खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन अध्यक्षा सौ मनीषा काटकर वसुंधरा फाउंडेशन कळमनुरी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, प्राचार्य रवी बोथीकर, करुणा बांगर, नामदेव राठोड, प्रा.एन.एस. बांगर, हितवा बोनिवाले, प्रा ज्योतीराम चव्हाण, माजी डी वाय.एस.पी. बाबुराव खंदारे, शिवाजी कराळे, डॉ.विठ्ठल रोडगे, खंडबाराव नाईक, रमेश गंगावणे, शिवाजी इंगोले आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कबड्डी स्पर्धेसाठी ४० पंच आलेले आहेत. २६ आणि २७ ऑक्टोबर या दोन दिवसीय विभागीय शालेय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

घरकुलाच्या हप्त्यांसाठी लाभार्थ्यांचे हेलपाटे

औंढा नागनाथ– तालुक्यातील शिरड शहापूर सर्कलमध्ये पंतप्रधान आवास व इतर आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना त्यांच्या हप्त्यासाठी पंचायत समितीमध्ये तीन महिन्यापासून वेळोवेळी चकरा माराव्या लागत आहे. तीन महिन्यापासून एकदाही डी एस सी लागली नसल्याचे कर्मचारी लाभार्थ्यांना सांगत आहेत. डीएससी लागल्यावर आपले पैसे त्वरित खात्यावर पडणार आहेत असे कर्मचारी सांगत आहेत. यामध्ये दोष कोणाचा आहे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालून गोरगरिबांना अशा दुष्काळाच्या परिस्थितीत हेळसांड करणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई अशी मागणी लाभार्थ्यांमधून होत आहे.

कळमनुरीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव आणि पथसंचलन उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा
कळमनुरी, २६ ऑक्टोबर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी कळमनुरी शहरात भव्य पथसंचलन आणि विजयादशमी उत्सव उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास स्वयंसेवकांचा व नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला.

शहरातील महाराणा प्रताप चौक येथून या पथसंचलनाची सुरुवात झाली. त्यानंतर जुना पोलीस स्टेशन रोड, मठ कॉर्नर, कापसे कॉर्नर, बाजार चौक, ब्राह्मण गल्ली, मोठा मारुती, ठाकूर गल्ली या प्रमुख मार्गावरून हे संचलन आगेकूच करत विकास नगर परिसरातील तुळजाभवानी मंदिर परिसरात पोहोचले, जिथे या संचलनाचा समारोप करण्यात आला. शिस्तबद्ध पद्धतीने निघालेल्या या पथसंचलनाचे ठिकठिकाणी नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

संचलनानंतर आयोजित विजयादशमी उत्सवात सातारा येथील ज्येष्ठ प्रचारक प्रमोद देशपांडे यांनी उपस्थित स्वयंसेवकांना प्रमुख मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुका संघचालक डॉ. प्रताप जाधव हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड. खंदारे उपस्थित होते. परिसरातील महिला, पुरुष आणि मोठ्या संख्येने संघ स्वयंसेवक या उत्सवात सहभागी झाले होते.

स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ प्रचारक प्रमोद देशपांडे म्हणाले की, भारतावर अनेक वर्षे परकीय आक्रमकांची राजवट राहिली. हिंदू समाजात ऐतिहासिक काळापासून एकतेचा अभाव राहिल्यानेच परकीयांना येथे राज्य करणे शक्य झाले. मात्र, आज भारतातील हिंदू समाज संघटित होत असून, यामुळे देशाला परकीय शक्तींपासून कोणताही धोका उरलेला नाही.

पुढे बोलताना त्यांनी देशातील सध्याच्या काही आंदोलनांवर भाष्य केले. सध्या देशात सुरू असलेल्या काही आंदोलनांना विदेशी शक्तींचे सहकार्य लाभत असून, त्यामुळे या आंदोलनांची दिशा भरकटवली जात आहे. आज भारत विकासाच्या नवनवीन संकल्पना राबवून जगात आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे आणि महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताची ही प्रगती काही विदेशी शक्तींना पाहावली जात नसल्यानेच असे खटाटोप केले जात आहेत, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

डॉ. हेडगेवार यांनी समस्त हिंदू समाज संघटित व्हावा, समाजात एकोपा रहावा आणि एक बलशाली भारताची निर्मिती व्हावी, या उदात्त उद्देशातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली होती. गेल्या शंभर वर्षांपासून संघाचे हे राष्ट्रउभारणीचे कार्य अविरतपणे सुरू असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

महावितरणमधील गैरव्यवहाराची एसआयटीमार्फत चौकशी करा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ ऑक्टोबर

जिल्ह्यातील नर्सी नामदेव येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्रातील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी ६ कि.मी. उच्चदाब वीजवाहिनी व ११ केव्ही फिडर बसविण्याच्या कामात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मंजूर अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झाले नसतानाही संबंधित कंत्राटदाराला सुमारे ५० लाख ३७ हजार ६३८ रुपयांचे संपूर्ण देयक अदा करण्यात आल्याचा आरोप असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणी यापूर्वी निवेदने देण्यात आली असून, महावितरणच्या नांदेड परिमंडळ कार्यालयाने पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन केल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र, अद्याप सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदाराविरुद्ध अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

या प्रकरणाची स्वतंत्र विशेष तपास पथकामार्फत चौकशी, संबंधित कामांचे विशेष लेखापरीक्षण, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, शासनाच्या निधीची वसुली करणे तसेच संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, हिंगोली जिल्ह्यातील मागील दोन वर्षांतील महावितरणच्या विविध कामांचीही सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई न झाल्यास, दिनांक १६ नोव्हेंबर मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांच्या निवासस्थानासमोर अर्धनग्न आंदोलन करण्यात येईल,असा इशारा संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम व सर्व पदाधिकारी, यांनी दिला आहे.

पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त शेती, औद्योगिक वापरासाठी पाणी उपसण्यास प्रतिबंध, आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ ऑक्टोबर

अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई आणि भूजल पातळीत झालेली घट लक्षात घेता, वसमत उपविभागातील वसमत व औंढा नागनाथ तालुक्यांतील सर्व सार्वजनिक जलस्रोतांमधून पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी विकास माने यांनी याबाबत प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले आहेत. हे आदेश १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू करण्यात आले असून, पुढील आदेशापर्यंत किंवा जून २०२७ अखेरपर्यंत, पाणीटंचाई संपेपर्यंत लागू राहतील.

सन २०२६ च्या पावसाळ्यात झालेला अपुरा पाऊस आणि वाढत्या तापमानामुळे दोन्ही तालुक्यांतील भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, उपलब्ध पाणीसाठा मानवी व पशुधनाच्या पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जलस्रोतांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वसमत व औंढा नागनाथ तालुक्यातील लघु, मध्यम व मोठे पाटबंधारे तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे आणि अन्य सार्वजनिक जलाशयांमधून खासगी व्यक्ती, शेतकरी, व्यावसायिक किंवा संस्थांना विद्युत अथवा डिझेल पंप, थेट पाइपलाइन किंवा टँकरद्वारे शेती सिंचन, बांधकामे, औद्योगिक वापर आदी कारणांसाठी पाणी उपसता येणार नाही. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जलाशयांवर अनधिकृतपणे बसविण्यात आलेले खासगी विद्युत पंप व पाईपलाईन तातडीने हटविण्यात यावेत. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांव्यतिरिक्त खासगी शेती व औद्योगिक वापरासाठी देण्यात आलेला विद्युत पुरवठा खंडित करण्याचे निर्देश महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या शासनमान्य सार्वजनिक पिण्याच्या पाणीपुरवठा योजना, पाणीटंचाई निवारणासाठी अधिग्रहित केलेल्या विहिरी व अन्य अधिकृत जलस्रोत तसेच पिण्याच्या पाण्यासाठी अधिकृत टँकर भरण्याच्या प्रक्रियेला या आदेशातून वगळण्यात आले आहे.

या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वसमत व औंढा नागनाथ तालुक्यांचे तहसीलदार, पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी, संबंधित पोलीस अधिकारी, पाटबंधारे व लघुपाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांवर भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३, महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील तरतुदी आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणारे विद्युत पंप व संबंधित साहित्य जप्त करण्यात येणार आहे.

उपलब्ध पाणीसाठा हा नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेसाठी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने नागरिकांनी या आदेशाचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

वंचीत बहुजनचा इशारा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ ऑक्टोबर

सोशल मिडीयाच्या माध्यमातून वंचीत बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ प्रकाश आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह मजकूर प्रसारीत करणाऱ्या गजानन उर्फ गजू विठ्ठल सारंग यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने पोलिस अधीक्षक यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याप्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे रविवारी वंचीतच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षक कार्यालय गाठून संबंधितावर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावेळी राहुल करवंदे, सुनील खिल्लारे आदींची उपस्थिती होती.

विकसित हिंदुस्थानासाठी समाज संघटित होणे गरजेचे!

अखिल भारतीय सहसरकार्यवाह आलोककुमारजी यांचे प्रतिपादन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२६ ऑक्टोबर -

देशाच्या विकासासाठी आणि विकसित हिंदुस्थानाचे स्वप्न साकार करण्यासाठी समाज संघटित होणे अत्यंत गरजेचे आहे. विचार आणि सिद्धांत कायम जिवंत राहतात. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये व्यक्तीला नव्हे, तर विचारांना महत्त्व असून भगवा ध्वज हाच संघाचा गुरु आहे. समाजाच्या एकतेतूनच राष्ट्राची प्रगती साधता येते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सहसरकार्यवाह आलोककुमारजी यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवाचे आयोजन रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून आलोककुमारजी बोलत होते. स्व. शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी हिंदू संस्कृती, परंपरा, रूढी आणि वर्तमान सामाजिक परिस्थितीचे विवेचन करताना विविध ऐतिहासिक व पौराणिक दाखले दिले.

विजयादशमीचा इतिहास आणि परंपरेचे महत्त्व

विजयादशमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून त्यामागे ऐतिहासिक परंपरा, शौर्य, विजय आणि सामाजिक एकतेचा संदेश दडलेला आहे, असे सांगत आलोककुमारजी यांनी या सणाचे महत्त्व विशद केले. पूर्वी राजे विजयादशमीपासून युद्ध मोहिमांना प्रारंभ करीत असत. युद्ध नसलेल्या काळात सीमोल्लंघन करून विजयाची प्रेरणा घेण्याची परंपरा होती. शमी वृक्षाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

देशाच्या विविध भागांत विजयादशमी वेगवेगळ्या परंपरांनी साजरी केली जात असली, तरी त्यामागील विजयाची आकांक्षा आणि संस्कृतीचे जतन हा समान धागा आहे. बिहारमधील पाटणा ते नांदेड येथील हजूर साहेब यांच्याशी संबंधित ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भांचाही त्यांनी उल्लेख केला.

व्यक्तीपेक्षा विचार आणि सिद्धांत महत्त्वाचे!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीविषयी बोलताना आलोककुमारजी म्हणाले की, विचार आणि सिद्धांत हे दीर्घकाळ समाजाला दिशा देत असतात. त्यामुळे संघामध्ये व्यक्तिपूजेऐवजी भगव्या ध्वजाला गुरुस्थान देण्यात आले आहे. भगवा ध्वज त्याग, समर्पण, परंपरा आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहे.

शंकराचार्यांनी आणि विविध आखाडा परंपरांनी समाजजीवनात जपलेल्या तत्त्वांचा संदर्भ देत चांगल्या विचारांचे आणि मूल्यांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांचा विस्तार करणे, समाजाला एकत्र आणणे आणि संघटित समाजाची निर्मिती करणे, हेच संघाच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सामाजिक ऐक्याला बाधा आणणाऱ्या प्रवृत्तींपासून सावध राहा

सध्याच्या परिस्थितीत समाजातील कौटुंबिक संबंध, जाती-जातींमधील सलोखा आणि धार्मिक ऐक्य यांच्यात दुही निर्माण करण्याचे प्रयत्न होत असल्याची चिंता आलोककुमारजी यांनी व्यक्त केली. समाजातील विविध घटकांमध्ये द्वेष निर्माण करून परंपरा आणि व्यवस्थेला विरोध करण्याचे प्रयत्न होत असताना स्वयंसेवकांसह सर्वसामान्य नागरिकांनी सावध राहणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील वारकरी परंपरेचे उदाहरण देताना त्यांनी 'माउली' या प्रेमळ संबोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. एका प्रेमळ हाकेने माणसांमधील अंतर कमी होते, परस्परांमध्ये जिव्हाळा निर्माण होतो आणि नातेसंबंध दृढ होतात. समाजात प्रेम, विश्वास आणि बंधुभाव टिकवून ठेवण्यासाठी अशा परंपरांचे महत्त्व मोठे आहे, असे त्यांनी नमूद केले.

समाजाला एकत्र आणणाऱ्या आणि समाजात नकारात्मकता निर्माण करणाऱ्या आंदोलनांमधील फरक स्पष्ट करताना त्यांनी मंडल आयोग आणि रामजन्मभूमी आंदोलनाचा संदर्भ दिला. समाज संघटित करण्यासाठी सकारात्मक विचार आणि व्यापक सामाजिक सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सनातन परंपरेबद्दल वाढता उत्साह

देशभरातील तीर्थक्षेत्रांमध्ये स्नानासाठी आणि धार्मिक उत्सवांमध्ये सहभागी होण्यासाठी नागरिकांची वाढती गर्दी दिसून येत आहे. धार्मिक परंपरांबद्दल समाजात उत्साह वाढत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संस्कृती, सनातन परंपरा आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याची जबाबदारी प्रत्येकाने ओळखली पाहिजे, असे मत आलोककुमारजी यांनी मांडले.

भारतीय समाजाची परंपरा ही केवळ धार्मिक आचार-विचारांपुरती मर्यादित नसून ती कुटुंबव्यवस्था, सामाजिक संबंध, परस्पर सहकार्य आणि जीवनमूल्यांशी जोडलेली आहे. या परंपरांचे संवर्धन करताना समाजातील सर्व घटकांमध्ये परस्पर आदर आणि सलोखा कायम राहणे आवश्यक आहे, असा संदेशही त्यांच्या विवेचनातून पुढे आला.

संघाच्या शताब्दी वर्षात १२ कोटी लोकांपर्यंत संपर्क

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील कार्याचा उल्लेख करताना आलोककुमारजी यांनी सुमारे १२ कोटी लोकांशी संपर्क साधण्यात आल्याचे सांगितले. समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचून संघटन, संवाद आणि सामाजिक सहभाग वाढविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

देशांतर्गत तसेच जागतिक परिस्थितीचा विचार करता समाजाने संघटित राहणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. देशाच्या विकासासाठी शासनाकडून रस्ते, दळणवळण, संचार, पाणी आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र, विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यासाठी समाजाचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. केवळ शासकीय योजनांवर अवलंबून न राहता प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी योगदान दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

विकसित हिंदुस्थानासाठी प्रत्येकाचे योगदान आवश्यक

देशाला विकसित हिंदुस्थानाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. सामाजिक एकता, परस्पर सहकार्य आणि राष्ट्रहिताची भावना या विकासाच्या महत्त्वाच्या आधारशिला आहेत. समाज संघटित राहिला, तर अनेक आव्हानांवर मात करता येऊ शकते. त्यामुळे संघटन, समर्पण आणि सेवाभाव या मूल्यांच्या आधारे समाजाच्या उन्नतीसाठी काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

'आम्ही पूर्वीही होतो, आजही आहोत आणि पुढेही राहू मात्र समाजाने संघटित राहणे गरजेचे आहे. विकसित हिंदुस्थान घडविण्यासाठी प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी केले पाहिजे,' असा संदेश देत आलोककुमारजी यांनी आपल्या भाषणातून सामाजिक संघटन आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले.

या विजयादशमी उत्सवाला नांदेड शहरातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक, नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऐतिहासिक संदर्भ, सांस्कृतिक परंपरा आणि वर्तमान सामाजिक परिस्थिती यांची सांगड घालत आलोककुमारजी यांनी केलेल्या मार्गदर्शनातून समाज संघटित करण्याचा आणि राष्ट्राच्या विकासासाठी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला.

पो. नि. चिंचोलकरांनी दिले दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महिन्याचे वेतन

नांदेड - दुष्काळग्रस्त परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये एक दिवसाचा पगार द्यावा म्हणून

महाराष्ट्र शासनाने सर्व अधिकारी कर्मचारी यांना आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी एक दिवसाचे नव्हे तर पूर्ण एक महिन्याचे वेतन हे मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा केले आहे. पाऊस न पडल्याने दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी राजा अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांना सावरण्यासठी मदतीची आवश्यकता असुन या सामाजीक जाणिवेचे भान ठेवत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी एक महिन्याचे जवळपास एक लाख रुपये वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा केले आहे. मागील वर्षी पण अति पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती.त्यावेळीही पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी एक महिन्याचे वेतन नांदेड जिल्हा सहायता निधी जिल्हाधिकारी कार्यालय येथे मदतीसाठी दिले होते.

दिव्या चित्तारे यांची वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी ; बीएएमएस पदवी उत्तीर्ण

नवीन नांदेड - नांदेड येथील शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय व महाविद्यालय येथून कुमारी दिव्या प्रकाश चितारे हिने प्रतिकूल

परिस्थितीत आपल्या जिद्दीने वैद्यकीय क्षेत्रातील बीएएमएस ही पदवी मिळवल्याबद्दल सर्व क्षेत्रातून तिचे अभिनंदन करून पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संचालिका श्रीमती ज्योती प्रकाश चित्तारे यांची सुकन्या कु. दिव्या प्रकाश चित्तारे हिने शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय व महाविद्यालय, नांदेड येथून जिद्द मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर यशाला गवसणी घातली आहे वैद्यकीय क्षेत्रातील आयुर्वेदामधील बी ए एम एस पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनी यश संपादन केले आहे. या तिच्या यशा बद्दल विद्यापीठातील कर्मचारी संघटनेचे मार्गदर्शक नेते काळबा हनवते, शशिकांत लोहबंदे, संदीप एडके यांनी कुमारी ज्योती चितारे व तिची आई ज्योती प्रकाश चीतारे यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले

परमेश्वर शक्करगे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात

हिमायतनगर -जगदंब शिक्षण प्रसारक मंडळ, माहूरद्वारा संचलित श्री जगदंबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माहूर येथे दि. २४ जानेवारी २०२६ रोजी परमेश्वर लक्ष्मणराव शक्करगे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

अनेक वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव, सहकाऱ्यांच्या आठवणी आणि मान्यवरांच्या शुभेच्छांनी हा सोहळा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रेणुका मातेच्या प्रतिमेचे पूजन करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून परमेश्वर शक्करगे यांच्या सेवाकार्याचा गौरव केला. सेवापूर्ती म्हणजे केवळ नोकरीतील एका पर्वाची समाप्ती नसून, आयुष्यभर जपलेल्या कर्तव्यनिष्ठेचा, अनुभवाचा आणि माणुसकीच्या नात्यांचा सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सोहळ्याला जगदंब शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयदादा भोपी, सचिव विजयकुमार भोपी, सहसचिव राजकुमार भोपी, हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीर सेठ श्रीश्रीमाळ, हिमायतनगरचे नगराध्यक्ष रफिक सेठ, अक्कलवाड सर, गणेश शिंदे, रामभाऊ सूर्यवंशी, गजानन मांगुळकर ,नगरसेवक आशिष सकवान, विलास वानखेडे, संजय माने, बाळू अण्णा चवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आठवणींना उजाळा; शुभेच्छांनी भारावले शक्करगे सर

सेवापूर्ती गौरव सोहळ्यादरम्यान उपस्थित मान्यवरांनी परमेश्वर शक्करगे यांचा सन्मान करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अनेकांनी शक्करगे सरांसोबतच्या सहवासातील आठवणी सांगत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आणि जपलेल्या आपुलकीच्या नात्यांविषयी भावना व्यक्त केल्या.

दिवाळी प्रवासात जादा भाडे आकारणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स विरुद्ध तक्रार करा

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२६ ऑक्टोबर -

दिवाळी सण व सुट्यांच्या कालावधीत प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता खासगी ट्रॅव्हल्स बसमधून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी निर्धारित भाड्यापेक्षा जादा भाडे आकारले जात असल्यास संबंधितांविरुद्ध तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेसाठी शासन किंवा सक्षम प्राधिकरणाने लागू केलेल्या विशेष सणकालीन भाडेवाढीच्या तरतुदीनुसार नियमित भाड्याच्या दीडपट (१.५ पट) भाडे आकारण्यास परवानगी आहे. मात्र कोणत्याही खासगी ट्रॅव्हल्सना मनमानी पद्धतीने यापेक्षा जादा भाडे आकारण्याचा अधिकार नाही. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासापूर्वी आकारण्यात येणाऱ्या भाड्याची खात्री करूनच तिकीट घ्यावे.

जादा भाडे आकारल्यास तक्रार नोंदवा

खासगी ट्रॅव्हल्सकडून निर्धारित भाड्यापेक्षा जादा रक्कम आकारण्यात आल्यास प्रवाशांनी तात्काळ तक्रार नोंदवावी. तक्रारीसाठी संबंधित ट्रॅव्हल्सचे नाव, बस क्रमांक, प्रवासाचा मार्ग, प्रवासाची तारीख आणि आकारलेले भाडे याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

जादा भाडे आकारल्याचा पुरावा म्हणून प्रवासाचे तिकीट व भाडे भरल्याची पावती जतन करावी. तसेच संबंधित ट्रॅव्हल्सचे नाव, बस क्रमांक, प्रवासाचा मार्ग, दिनांक आणि आकारलेले भाडे याबाबतची सविस्तर माहिती तक्रारीसोबत द्यावी.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा

जादा भाडे आकारणीबाबतची तक्रार प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड येथे नोंदविता येईल. या कार्यालयाचा ई-मेल ीं.२६-ाहर्सी.ळप व दूरध्वनी क्र. ०२४६२-२५९९०० हा असून दिवाळीच्या सुट्यांमध्ये प्रवाशांची गैरसोय होऊ नये तसेच त्यांची आर्थिक लूट होऊ नये यासाठी प्रवाशांनी सहकार्य करावे. प्रवासापूर्वी भाड्याची खात्री करावी आणि निर्धारित भाड्यापेक्षा जादा आकारणी होत असल्यास तात्काळ तक्रार नोंदवावी, असेही आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

आसना गार्डन श्रमदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२६ ऑक्टोबर -

सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत, 'आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने आसना गार्डन परिसरात भव्य स्वच्छता व श्रमदान मोहीम उत्साहात पार पडली. आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे आनंद कल्याणकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शेकडो नांदेडकरांनी एकत्र येऊन अवघ्या दीड तासात तब्बल पावणेदोन किलोमीटर लांबीचा संपूर्ण परिसर चकाचक केला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून आमदार बालाजी कल्याणकर यांनीही या कार्याची दखल घेत आसना गार्डनच्या विकासकामासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

आनंद कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी ६ वाजता संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व राष्ट्रगीताने झाली. कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानाचे चोख नियोजन करण्यात आले होते. सहभागी नागरिकांना प्रत्यक्ष हॅन्डग्लोव्हज, पोती व कॅरिबॅगचे वाटप करण्यात आले.

हदगाव पश्चिम मंडलातर्फे 'मन की बात' कार्यक्रम

तभा वृतसेवा
हदगाव, दि.२६ ऑक्टोबर -

देशाचे लाडके प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' या रेडियो कार्यक्रमाचा १३९ वा भाग नुकताच आदिवासी भगिनींसोबत मोठ्या उत्साहात ऐकण्यात आला. भारतीय जनता पार्टी (भाजप) हदगाव पश्चिम मंडलाच्या वतीने मौजे गायतोंड महादेव वस्ती येथे या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विचार ऐकण्यासोबतच आगामी दिवाळी सणाच्या निमित्ताने उपस्थित आदिवासी महिलांना 'मोदी भेट' म्हणून साड्यांचे वाटप करण्यात आले. सणाच्या तोंडावर मिळालेल्या या भेटीमुळे महिलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला आणि त्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त व मोठा प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, तातेराव पाटील, सूर्यकांत हनवते, काशीनाथ रावते, योगेश डाखोरे, अंकुश वानोळे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

लोहा शहर फायनान्स कंपन्यांच्या विळख्यात ; शहरवाीय दहशतीत

तभा वृतसेवा
लोहा, दि.२६ ऑक्टोबर -

शहरात खासगी व्यक्तीचे फायनान्स, स्मॉल फायनान्स कंपन्या आणि खासगी कर्ज पुरवठादारांकडून कर्ज घेणाऱ्या नागरिकांना वसुलीच्या तगाद्याचा सामना करावा लागत आहे. कर्जाच्या वसुली हप्त्यांसाठी वारंवार फोन, घरी जाऊन विचारणा करणे आणि वसुलीसाठी दबाव आणला जात असल्याच्या अनेक तक्रारी महिला वर्गातुन ऐकायला मिळत आहेत. या प्रकारामुळे अनेक कुटुंब सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.अनेक कुटुंबांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वसुलीच्या तगद्याने अनेक कुटुंब आर्थिक अडचणीचा सामना करत आहेत, कर्ज फेडण्यासाठी कुटुंबांची कोंडी होत आहे.

सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे आणी महागाई वाढत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे, अनेक नागरिकांच्या हाताला रोजगार उपलब्ध होईल याची शाश्वती सांगता येत नाही तरी कुटुंब रोजगार उपलब्ध होईल या आशेने जगत आहे. आगामी काळात घरगुती खर्च भागविणे जिकिरीचे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक कुटुंबाला कर्ज फेडणे जिवावर बेतले जात आहे. अनेक कुटूंबाने खाजगी व्यक्तीकडुन किंव्हा मायक्रो फायनान्स कंपनीकडुन घर संसाराच्या अडचणी साठी कर्ज व हात उसने घेतले पण वेळेत फेड होत नसल्याने व्याजाचा हाप्ता लावून वसुलीचा तगादा लावुन वसुलीला सुरुवात केल्याने अनेक कुटुंब दहशतीखाली वावरत आहेत याचा परिणाम कुटुंबातील सदस्यांवर होत आसल्याचे बोलले जात आहे. जिवनातील अडचण सोडवण्यासाठी कर्जाचा आधार घेताला मात्र फेड करणे जिवावर बेतत आहे. कुटुंबाचे उत्पन्न कमी झाल्याने वेळेवर हप्ते फेडता आले नसल्यास संबंधित कुटुंब वसुली तगद्याल भिऊंन दहशतीखाली वावरतो.

वसुलीच्या तगद्याला अनेक नागरिकानी खाजगी व्यक्तीकडुन घेतलेली रक्कम व फायनान्स कंपनी कडुन घेतलेली रक्कमेचे हाप्ते परत करणे कठीण होत आहे शेतकरी,शेतमजुर दैनंदिन उपजिवेकेसाठी काम शोधुन उपजिविका करतो अशा कुटुंबाला शासनाच्या आधाराची नितांत गरज आहे. अशा परिस्थितीत कर्जवसुली करताना नियमांचे पालन होणे आवश्यक आहे पण गुंडा प्रवृत्तीचे वसुलीदार ठेऊन धमक्या दिल्या जात आहेत, वसुलीच्या कर्जाच्या थकीत हप्त्यांची वसुली करणे हा वित्तीय संस्थांचा अधिकार असला, तरी त्यासाठी धमकी देणे, शिवीगाळ करणे, सार्वजनिक ठिकाणी अपमानित करणे किंवा कुटुंबीयांवर अनुचित दबाव आणणे योग्य नाही.

अशा प्रकारच्या घटना घडत असल्यास संबंधित नागरिकांनी पुराव्यांसह तक्रार करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी जिल्ह्यातील सर्व पत वित्तीय संस्थेची बैठक घेऊन संबंधितांना सक्त ताकीद दिली आहे सकाळी वेळात वसुलीसाठी घरी जाऊन त्रास देऊ नये संध्याकाळी फोन करुन वसुलीसाठी उध्दट बोलुन आपमानित करु नये कुटुंबाची परिस्थिती बघुन वसुली करावी अन्येथा तक्रार प्राप्त होताच योग्य ती कारवाई करू असे सांगितले याकडे तालुका प्रशासनाने लक्ष ठेवण्याचे सुचित केले.

स्मॉल फायनान्स व खासगी कंपनी वसुलीदाराची पोलिस ठाण्यात नोंद करावी कोणता वसुली व्यक्ती कोणत्या फायनान्स कंपनीची वसुली करतो आणि किती कुटुंबाकडे वसुली आहे याची माहिती देऊन वसुली करावी पोलिस ठाण्यात नोंद न करता वसुली करत असेल त्यावर गुन्हे नोंद करावे ज्या ठेकेदारांने रक्कम दिली त्या गरिब कुटुंबाल परत करता आली नसेल तर त्या ठेदाराने ती रक्कम सोडुन दिली पण तिरायतदार तगादा लावून रक्कम वसूल करत आहेत

स्मॉल फायनान्स कंपनीचे कर्ज घेतले कुटुंबातील कमवता सदस्यांचे निधन झाले तर पुर्ण हाप्त्याची रक्कम माफ होत असते हे कंपनी वाले सांगतात पण दोन तीन महिने झाले की वसुलीदार वसुली करण्यासाठी घरी दाखल होतात अशा वसुदारावर गुन्हे दाखल करावे. हाप्ते रुकलेतर वाहान ओढुन घेऊन जाने,हाप्ते भरण्यास वेळ लागला तर वसुलीदार घरीच बसुन राहाने हे प्रकार बंद झाले पाहीजे सकाळी व संध्याकाळी वसुलीला येत असेल तर अशा वसुलीदाराला पाबंद केले पाहिजे याची शासनाने दखल घेऊन काटेकोर नियमावली स्थानिक पातळीवर तहसीलदार, पोलिस ठाणेआमलदारा आदेशीत करावे अशी चर्चा ऐकायला मिळत आहे.

सोयाबीन खरेदीतील अवैध कट्टी विरोधात प्रशासनाचे कडक निर्देश

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२६ ऑक्टोबर -

सोयाबीन खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांच्या मालातून अवाजवी कट्टी कपात करून त्यांचे आर्थिक नुकसान केले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना कडक निर्देश दिले आहेत. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बालाजी गणेशराव बच्चेवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर हा विषय ऐरणीवर आला असून, शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

बालाजी बच्चेवार यांनी २४ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सोयाबीन खरेदीतील कथित अवैध कट्टीचा प्रकार रोखण्याची मागणी केली होती. या निवेदनाच्या अनुषंगाने दैनिक 'तरुण भारत' मध्येही वृत्त प्रसिद्ध झाले होते. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळावा आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राहावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

निवेदनातील आरोपानुसार, बारदान्यासह ५० किलो ८०० ग्रॅम वजन अपेक्षित असताना काही व्यापारी व अडते ५२ किलो २०० ग्रॅम वजन करून शेतकऱ्यांच्या मालातून अतिरिक्त कपात करीत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक पोत्यामागे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या प्रकाराची योग्य तपासणी करून नियमबाह्य वजनकपात करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधकांनी दिलेल्या निर्देशांनुसार, शेतमालातून अवैध कट्टी घेण्याच्या प्रकारांना आळा घालणे, हमाली, तोलाई व अडतीचे दर दर्शनी भागात प्रसिद्ध करणे, प्रत्येक व्यवहाराची पक्की पावती देणे आणि शेतमालाची रक्कम विहित मुदतीत अदा करणे याकडे बाजार समित्यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. याशिवाय प्रमाणित वजन-मापांचा वापर, शेतमालाची नासाडी रोखणे आणि सुरक्षित साठवणुकीची व्यवस्था याबाबतही दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. किमान आधारभूत किमतीसंदर्भातील लागू नियमांचे पालन करण्यावरही भर देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधित बाजार समिती व सचिवांना जबाबदार धरण्याचा इशाराही निर्देशांमध्ये देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याची आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींचे गांभीर्याने निराकरण करण्याची जबाबदारी बाजार समित्यांवर आहे.

सोयाबीन उत्पादनासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात मेहनत आणि खर्च करतात. अशा परिस्थितीत खरेदी च्या वेळी होणारी नियमबाह्य वजनकपात त्यांच्या उत्पन्नावर परिणाम करू शकते. त्यामुळे प्रशासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होऊन शेतकऱ्यांची संभाव्य आर्थिक लूट थांबावी, व्यवहार पारदर्शक व्हावेत आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळावा, अशी अपेक्षा शेतकरीवर्गातून व्यक्त होत आहे.